सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ०५ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बंगळुरमध्ये चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू

### चिन्नास्वामी स्टेडियम परिसरात भीषण चेंगराचेंगरी, २५ जणांची प्रकृती गंभीर

बंगळुरू: मंगळवारी रात्री अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या आयपीएल २०२५ च्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने विजेतेपद पटकावत, गेल्या १८ वर्षापासूनचे आयपीएल ट्रॉफी मिळवण्याचे स्वप्न पूर्ण केले. केवळ आरसीबी संघालाच नाही तर त्यांच्या चाहत्यांसाठी देखील हा विजय खूप मोठा आणि भावनाशील ठरला, पण जेव्हा याचा आनंद साजरा करण्याची वेळ आली तेव्हा चेंगराचेंगरीसारखा दुर्दैवी प्रकार बंगळुरूच्या रस्त्यावर घडला. ज्यामध्ये ७ जणांचा दुर्दैवी मृत्यू तर अनेकजण गंभीर जखमी झाले.

रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएलची ट्रॉफी पटकावत, आरसीबी चाहत्यांची १८ वर्षाची प्रतीक्षा अखेर संपवली. विराट कोहलीने सर्वाधिक ४३ धावा केल्या आणि आरसीबीला १९० धावांचा डोंगर



उभारून दिला. त्यानंतर जोश हेझलवूड आणि कृणाल पंड्याने पंजाबचा पाठलाग थांबवला. अखेर बेंगळुरूने पहिल्यांदाच आयपीएलच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. त्यामुळे हा विजय प्रत्येकांसाठी मोठा होता. त्यामुळे या विजयाच्या निमित्ताने बंगळुरू शहरात विजय परेड आणि विशेष उत्सव आयोजित केले गेले असता, खेळाडूंना आणि आयपीएलची ट्रॉफी पाहायला आलेल्या लोकांचा उत्साह इतका नियंत्रणाबाहेर गेला की, त्यांना आटोक्यात आणणे स्थानिक पोलिसांच्या क्षमतेबाहेर गेले. ज्याचे स्वरूप भीषण चेंगराचेंगरी आणि किंकाळ्याने घेतली.

एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर ६ ते ७ लाख चाहत्यांची गर्दी

४ जून रोजी आयपीएल २०२५ चॅम्पियनशिपमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी बेंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर लाखो चाहते जमले होते. दरम्यान स्टेडियमच्या गेट क्रमांक ३ वर चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. ज्यामध्ये अनेक चाहते जखमी झाले. जखमी झालेल्यांना बेंगळुरूमधील बोरिंग हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. दरम्यान ११ जणांचा मृत्यू तर २५ हून अधिक जणांची प्रकृती गंभीर असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

लाठीचार्ज नंतर चेंगराचेंगरी

बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना चेंगराचेंरी झाली. यावेळी परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. पोलिसांनी आरसीबीच्या चाहत्यांवर सौम्य लाठीचार्ज देखील केला. मिळालेल्या माहितीनुसार चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट क्रमांक ३ जवळ चेंगराचेंगरी सारखी स्थिती निर्माण झाली होती. दुसऱ्या एका घटनेत, आरसीबीच्या चाहत्यानं स्टेडियममध्ये उडी मारण्यासाठी गेटवरून चढण्याचा प्रयत्न केला. यावेळी अचानक पाय घसरून तो जमिनीवर पडला. यावेळी त्याचा पाय मोडला.

विजय परेड रद्द

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा आयपीएल ट्रॉफी विजयानिमित्त समारंभ होत असल्यानं पोलिसांचा प्रचंड बंदोबस्त होता. मात्र, चाहत्यांना नियंत्रित करण्यास पोलिसांना अनेक अडचणी येत होत्या. अतिउत्साही लोकांनी कार्यक्रम पाहण्याकरिता थेट झाडावर चढण्यास सुरुवात केली. कर्नाटक सरकारनं सुरक्षेच्या कारणास्तव विधानसभा ते चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियमपर्यंतची विजय परेड रद्द केली होती.

चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंतच्या ओपन-बस विजय परेडचा भाग म्हणून, बहुप्रतिक्षित ट्रॉफीसह त्यांच्या आवडत्या खेळाडूंची एक झलक पाहण्यासाठी, चाहत्यांचा लोंढा सायंकाळपासूनच स्टेडियमवर जमू लागला होता. यामुळे स्टेडियममधील आणि आजूबाजूचे रस्ते कोंडीत सापडले होते आणि सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक्ट (सीबीडी) परिसरात वाहनांची सुरळीत हालचाल सुनिश्चित करण्यात वाहतूक पोलिसांना अडचण येत होती.

## १३०० मीटर लांब, ४६७ मीटर ऊंच...चिनाब रेल्वे पुलाचे उद्‌घाटन होणार पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते

श्रीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारी ( ६ जून) जम्मू-काश्मीरची राजधानी श्रीनगरला रेल्वेने जोडण्याकरिता बांधण्यात आलेला जगातील सर्वात उंच रेल्वे पूल, चिनाब पुलाचे उद्घाटन करणार आहेत. तसेच श्रीनगर ते जम्मूमधील कटरा यांना जोडणाऱ्या दोन खास डिझाइन केलेल्या वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील, अशी घोषणा केंद्रीय अंतराळ मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केली. हा पूल जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाचा एक भाग आहे.

केंद्रीय अंतराळ मंत्री डॉ. सिंग यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही बातमी शेअर केली आणि म्हटले की, इतिहास घडत आहे... फक्त ३ दिवस बाकी आहेत! जगातील सर्वात उंच रेल्वे पूल, शक्तिशाली चिनाब पूल, जम्मू आणि काश्मीरमध्ये उंच उभा आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक चा एक भाग. निसर्गाच्या कठीण परीक्षांना तोंड देण्यासाठी बांधलेला. पंतप्रधान मोदी ६ जून २०२५ रोजी चेनाब



पुलाचे उद्घाटन करणार आहेत. नवीन भारताच्या ताकदीचे आणि दृष्टिकोनाचे अभिमानास्पद प्रतीक!

या रेल्वे लिंकचे उद्घाटन सुरुवातीला १९ एप्रिल २०२५ रोजी होणार होते, परंतु हलका ते मध्यम पाऊस आणि बर्फवृष्टीसह प्रतिकूल हवामान यामुळे ते पुढे ढकलण्यात आले. ६ जून रोजी होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या अनुरूप हे वेळापत्रक बदलण्यात आले आहे, कारण रेल्वे लिंकमुळे यात्रेकरूंचा प्रवास सुलभ होईल.

पुलांवर उच्च तंत्रज्ञानाचे कॅमेरे

दरम्यान, पंतप्रधानांच्या भेटीपूर्वी सुरक्षा व्यवस्था लक्षणीयरीत्या वाढवण्यात आली आहे. कटरा-संगलदन विभाग आणि संपूर्ण यूएसबीआरएल ट्रॅकवर बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे. विशेषतः कटरा, उधमपूर, रियासी आणि रामबन जिल्ह्यांमध्ये कसून तपासणी, सामानाची तपासणी आणि कोम्बिंग ऑपरेशन सुरू आहेत. संभाव्य धोक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅकवर, विशेषतः बोगदे आणि पुलांवर उच्च तंत्रज्ञानाचे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केलेल्या नवीन सुरक्षा ऑडिटनंतर हे उपाय करण्यात आले आहेत.

२ नवीन वंदे भारत एक्सप्रेस

मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी ६ जून रोजी रियासी जिल्ह्यातील चिनाब पुलावर पाहणीसाठी जाण्यापूर्वी उधमपूर येथे उतरण्याची अपेक्षा आहे.

## तामिळनाडूमध्ये सापडला 'अपशकुनी मासा'!

### तामिळनाडूमध्ये सापडला डूम्सडे मासा, हा मासा म्हणजे आगामी संकटाची चाहूल!

चेन्नई: तामिळनाडूच्या किनाऱ्यावर मच्छिमारांच्या जाळ्यात सापडलेल्या एका गूढ आणि विशाल माशाने संपूर्ण परिसरात खळबळ उडवली आहे, ज्याचा व्हिडिओ इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या माशाला अपशकुनी मासा असं म्हंटलं जातं. कारण हा जिथे दिसतो, तिथे संकटं हमखास येतात असा एक जगात समज आहे. याला 'डूम्सडे मासा' असेही म्हणतात.

तामिळनाडूच्या किनाऱ्यावर मच्छिमारांना सापडलेल्या डूम्सडे माश्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. या माशाचे दुर्दैव्य म्हणजे याला जगात अपशकुनी म्हंटलं जातं. या माश्याची लांबी जवळपास ३० फूटांपर्यंत असू शकते. या मासा तामिळनाडूच्या किनाऱ्पट्टीवर कसा आला? याला अपशकुनी असे का म्हंटले गेले? असे अनेक प्रश्न सामान्य लोकांना पडले आहेत. तर याबद्दल सविस्तर माहिती घेऊया.

आजही समुद्राच्या खोलवर असे अनेक रहस्यमय प्राणी राहतात, ज्याबद्दल माणसांना फार कमी माहिती आहे. यापैकी एक ओअरफिश आहे, ज्याला जग 'डूम्सडे मासा' म्हणून देखील ओळखते. त्याची झलक खूप दुर्मिळ आहे, परंतु जेव्हा हा मासा पृष्ठभागावर दिसतो तेव्हा एका अनाहूत भीतीची लाट घेऊन येतो. हा मासा आकाराने विशाल असल्यामुळे, जेव्हा तो जाळ्यात सापडला तेव्हा ७ मच्छिमारांना त्याला एकत्र उचलावे लागले.

## लोकोपयोगी कायदे करण्यात महाराष्ट्र देशात अग्रेसर : देवेंद्र फडणवीस

### विधीविधान शाखा बोधचिन्ह अनावरण व पुस्तक प्रकाशन

मुंबई, दि. ४: महाराष्ट्र हे देशात सर्व क्षेत्रात अग्रगण्य राज्य आहे. लोकोपयोगी कायदे निर्मितीमध्येही राज्य देशात अग्रेसर असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढत राज्याच्या कायद्याचे अनुकरण देशातील इतर राज्यच नाही, तर अन्य देशही करत असल्याचे सांगितले.

विधी व न्याय विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात विधी विधान शाखेचे बोधचिन्ह अनावरण आणि पाच पुस्तकांचे प्रकाशन सह्याद्री अतिथी गृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित



पवार, विधी व न्याय विभागाचे राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव सुवर्णा केवले, प्रधान सचिव व विधी सल्लागार श्री शुक्ला, विधी विधान शाखेचे सचिव सतीश वाघोले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या चढणघडणीमध्ये विधी व न्याय विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. विधिमंडळ हे कायदेमंडळ आहे, पण कायदा निर्मितीमध्ये विधी व न्याय विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान असते. राज्याचे अनेक कायदे देशाने स्वीकारले आहेत कायदा निर्मिती होत असताना विधिमंडळात कायद्यांवर तीन - तीन दिवस चर्चा झालेली आहे. चर्चेतून कायदा अस्तित्वात येत असतो. विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून निश्चितच या विभागात ' ट्रान्सफॉर्मेशन' ची सुरुवात या वर्षापासून करावी.

लोकोपयोगी व सध्या परिस्थिती लक्षात घेऊन कायदे निर्मिती करावी लागते. मागील कायद्यांमध्ये बदलही घडवावे लागतात. या संपूर्ण प्रक्रियेत कायदा ' ड्राफ्टिंग ' अत्यंत महत्त्वाचे असते. अचूक ड्राफ्टिंग असल्याने राज्याच्या कायद्यांना क्वचितप्रसंगी न्यायालयात अडचण निर्माण करण्यात आली आहे. लोकांच्या हिताच्या दृष्टीने कायदा कसा असावा, असा प्रयत्न नेहमी शासनाचा असतो. विधी व न्याय विभागाने निर्मित केलेली पुस्तके पुढील पिढीसाठी ठेवाच आहे. हे संदर्भ साहित्य म्हणून निश्चितच कायदा निर्मितीमध्ये उपयोगात येणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

विभागाच्या बळकटीकरणासाठी दिलेल्या प्रस्तावाबाबत शासन सकारात्मक असून निश्चितच याबाबत निर्णय घेतला जाईल.

प्रशिक्षण ही महत्त्वाची बाब आहे. विभागात कायमस्वरूपी प्रशिक्षण धोरण असावे. तसेच काही प्रशिक्षण बंधनकारक करण्यात यावीत. तंत्रज्ञान व कार्यपद्धतीत होत असलेल्या बदलांशी अनुरूप प्रशिक्षण धोरण असावे. आंतरवासिता कार्यक्रमांमध्ये ग्रामीण भागातील विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढवून या कार्यक्रमाची व्याप्ती विस्तृत करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

प्रस्ताविक सचिव सतीश वाघोले यांनी केले. त्यांनी विभागाची रचना, आव्हाने आणि विभागाची कार्यपद्धती विषद केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपसचिव श्रीमती विनायक कुल्लीवार यांनी केले. कार्यक्रमास विधी व न्याय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## आपत्तीमध्ये नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी काम करावे : मुख्यमंत्री

मुंबई, दि. ४ :- आपत्तीमध्ये जीवित व वित्त हानी सोबतच पायाभूत सोयी - सुविधांचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्न करून आपत्तीमध्ये सामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांना आपत्तीची झळ बसू नये यासाठी आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत आपत्ती व्यवस्थापनाचा निधी सौम्यीकरण कामासाठी खर्च व्हावा. तसेच पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृहात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.

राज्य आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले, पूर रेषा केवळ खुण म्हणून न ओळखता पूर रेषेच्या आत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठीचे सर्व्हेक्षण करताना अचूकतेसाठी उपग्रहाद्वारे मॅपिंग करावे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा. कोकण आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत घेण्यात येत असलेल्या भूमिगत वीज वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे बांधणे, दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आणि वीज अटकावची कामे गतीने करावीत.

आपदा मित्रांना आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांचा डाटाबेस तयार करावा. आपदा मित्रांना ओळखपत्र देण्यात यावे, अशा सूचना देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, येणाऱ्या प्रत्येक आपत्तीला सामोरे जाताना मागील परिस्थितीचा अनुभव लक्षात घेऊन त्यानुसार अचूक नियोजनद्वारे अंमलबजावणी करावी. ज्या भागात जी आपत्ती येते त्याचा सर्वंकष अभ्यास करून त्यानुसार त्या त्या भागातील ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापनाचे कीट उपलब्ध करून द्यावे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

नद्यांची वहन क्षमता वाढवण्यासाठी नदी स्वच्छ करून नदीतील गाळ काढणे, राडा रोडा काढणे आवश्यक आहे. या कामास जलसंपदा विभागाने प्राधान्य द्यावे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

आपत्ती व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किट देत असताना आवश्यक मनुष्यबळाचे प्रशिक्षणही देण्यात यावे. किट मधील साहित्याचा अपघाताच्या वेळी मदत कार्यात उपयोग होऊ शकतो. त्यामुळे ग्रामपंचायतींना किट देण्याबाबत कार्यवाही व्हावी, असे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यावेळी म्हणाले.

बैठकीत महाबळेश्वर व पाचगणी येथील विद्युत वाहिन्या भूमिगत करून वादळ वाऱ्यामुळे भविष्यात होणारे संभाव्य नुकसान टाळण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. बैठकीस मुख्यमंत्री सचिवालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, आपत्ती व्यवस्थापन व विभागाचे संचालक सतीशकुमार खडके उपस्थित होते.

## भारताचा कृषी गजराज चिनी ड्रॅगनपेक्षा अधिक मजबूत

### जागतिक अर्थशास्त्र परिषदेत प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

भारताचा कृषी गजराज चिनी ड्रॅगनच्या कृषी क्षेत्रापेक्षा आता अधिक मजबूत झाला आहे. गेल्या दोन वर्षात भारताने कृषी क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन अमेरिका व चीनला मागे टाकले असून, भारत कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण झाला असल्याचे मत प्रसिद्ध विचारवंत व माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी मंगळवारी, ३ जून रोजी ८ व्या जागतिक अर्थशास्त्र परिषदेत व्यक्त केले. पोलंडमध्ये वार्सा विद्यापीठाने आयोजिलेल्या अर्थशास्त्र परिषदेच्या दुसऱ्या सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विल्मा टकोविनी होते. या सत्रात

#### वृत्तपत्रांमुळे कृषी क्षेत्रात बदल

**विविध वृत्तपत्रांमुळे शेतीक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून येत आहेत. २०१४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या किसान दूरदर्शन वाहिनीमुळे सुद्धा शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडत आहे. भारतातील हिंदी तसेच सर्व दक्षिणात्य भाषेतील वृत्तपत्रे दर आठवड्याला शेतीविषयक सदरे चालवतात व शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती देतात, यात ग्रामीण मातीत रूजलेल्या दै. पुण्यनगरीचाही समावेश आहे.शेतीमध्ये कृत्रिम प्रज्ञा तंत्राचा (ए.आय.) उपयोगामुळे सुद्धा क्रांतिकारक बदल होत आहेत, असे डॉ. धारूरकर म्हणाले.**

प्रामुख्याने यश्चालाव बोगडाने, बार्बरा वेलिन्स्को, लडविक व्हिकी तसेच डॉ. धारूरकर यांनी शोधनिबंध सादर केले. या शोधनिबंधामध्ये शंतनू वाटाणे सहलेखक आहेत.

डॉ. धारूरकर पुढे म्हणाले, प्राचीन काळापासून भारतात शेतीचा विकास झाला आहे. नवाष्मयुग आणि ताम्रपाषाण युगात सुद्धा भारतीय शेतीचे अवशेष सापडतात. महाराष्ट्रात दायमाबाद उत्खननात कृषी क्रांतीची पहिली पहाट १४०० इ. स. पूर्वमध्ये झाली. त्यानंतर प्राचीन मध्ययुगीन काळात सुद्धा भारतीय शेतीचा सातत्याने विकास होत गेला, असे सांगून डॉ. धारूरकर यांनी पारंपरिक शेती आणि आधुनिक शेती यात सुंदर समन्वय साधून भारताने कृषी क्षेत्रात भरारी घेतली आहे, असे सूत्र मांडले.

भारताच्या आर्थिक क्रांतीचे खरे गमक कृषी क्षेत्रात आहे. कोरोना काळात इतर क्षेत्रे बंद होती. परंतु, शेती क्षेत्राने भारताचे मजबूत समर्थन केले व जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली. प्रतिकूल परिस्थितीतही शेती भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मनरेगा आणि अंत्योदय योजनांमुळे ग्रामीण भागातील शेवटच्या माणसापर्यंत विकासाची मधुर फळे पोहचविणे शक्य झाले. भारतीय संविधानातील डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी मांडलेल्या स्वातंर्त्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या तत्त्वांची अंमलबजावणी भारतातील राज्यव्यवस्था उत्तम प्रकारे करत आहे.

प्रश्नोत्तराच्या सत्रात डॉ. धारूरकर यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर युरोपातील विद्वानांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. या परिषदेला आशिया खंडातून दोन प्रतिनिधी उपस्थित होते. त्यापैकी भारताचे प्रतिनिधित्व डॉ. धारूरकर यांनी केले, ही गोष्ट मराठवाड्याच्या दृष्टीने भूषणावह आहे.



धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बाभळगाव येथे ग्रामस्थांच्या मदतीने उभारणार अंबाबाई मंदिर

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.४ जून -**



तुळजापुर तालुक्यातील बाभळगाव येथे ग्रामस्थांच्या मदतीने उभारणार अंबाबाई मंदिर मंगळवार दि.३ जुन रोजीच्या शुभ दिनी श्री अंबाबाई मंदिर या देवस्थानचा बांधकामाचा शुभारंभ नागनाथराव पंडितराव धरणे यांच्या हस्ते मंदिर बांधकाम शुभारंभ श्रीफळ वाढवून करण्यात आला.

यावेळी हभप. अशोकराव जाधव गुरुजी बाभळगावकर, अमर पाटील, शिवाजी संपंगे, जितेंद्र पाटील, अनिल पाटील, सुनील पाटील, ज्ञानेश्वर जाधव, नामदेव चव्हाण, महादेव चव्हाण, दिगंबर लोंढे, प्रशांत गायकवाड, सौदागर पौळ, हभप. नागनाथ कांबळे, सिद्राम भगत या सर्व गावकऱ्यांच्या हस्ते अंबाबाई मंदिर बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त...



### उद्धव कल्हारे-पाटील यांचा बदलीनिमित्त सत्कार

**लोहारा, दि.४ जून -**

लोहारा येथील उप डाकघर कार्यालयातील पोस्ट मास्तर उद्धव खल्लारे पाटील यांची सहाय्यक विभागीय कार्यालय लातुर येथे बदली झाल्याबद्दल लोहारा पोस्ट ऑफिसच्या वतीने कल्हारे-पाटील यांचा सत्कार करुन व भेटवस्तू देऊन निरोप देण्यात आला. यावेळी तुळजापूर पोस्ट उपविभाग कार्यालयातील इन्स्पेक्टर अनिल जाधव, ग्रामीण डाक सेवक कल्याण कांबळे, शिवराज झिंगाडे, माधव हाक्के, यांच्यासह आदी उपस्थित होते.



### अब्दुल शेख यांचा युवकांच्या वतीने सत्कार

**मंगरूळ, दि.४ जून -**

महाराष्ट्र मुस्लिम फ्रंट सामाजिक संघटनेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी अब्दुल शेख यांची नुकतीच सार्थ निवड झाल्याने तुळजापुर तालुक्यांतील आरबळी येथील युवकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथिल सामजिक कार्यकर्ते तथा समर्थ हॉटेलचे ओनर अब्दुल शेख यांनी यापूर्वी अनेक संघटनेत आपल्या कामाचा ठसा उमटवून गोरगरीबांना न्याय देण्यासाठी प्रयत्न केला आहे. सत्कार समारंभ प्रसंगी आरबळी येथील अब्बास अली नदाफ, नबिलाल नदाफ, समीर चांद नदाफ, कासिम नदाफ, समीर ह. नदाफ, इरफान शेख, वस्ताद रशीद नदाफ यांच्यासह अनेक युवक उपस्थित होते.



### अभिजित गोरे यांच्या बदलीनिमित्त सत्कार

**लोहारा, दि.४ जून -**

लोहारा येथील नगरपंचायत मधील स्वछता निरीक्षक अभिजीत गोरे यांची बदली झाल्याने त्यांच सत्कार करून निरोप देण्यात आला. त्याच्या कार्यकाळात त्यांनी जनसामान्यांच्या समस्या अत्यंत संवेदनशीलतेने ऐकून घेतल्या आणि त्यांचे उत्कृष्ट नियोजन व नेतृत्वगुणांनी अनेक कार्ये प्रभावीपणे पूर्ण केली. त्यांच्या सुसंवाद, विनम्रता आणि कार्यक्षमतेमुळे ते सर्वांचे लाडके अधिकारी ठरले. त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विलास भरारे, बाळासाहेब सातपुते, विशाल रोडगे, संजय स्वामी आदींसह नागरिक उपस्थित होते.

### वाशीत 'कुटुंब प्रबोधन' विषयावर व्याख्यान

**धाराशिव, दि.४ जून -**

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने दि.६ जून रोजी राज्यभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नामवंत विचारवंतांची पंचसूत्री परिवर्तन विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. ही संकल्पना कौशल्य विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांची आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील वाशी येथील जैनमुनी कुलभूषण देशभूषण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये 'कुटुंब प्रबोधन' या विषयावर यशवंत सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

# शेतकरी विरोधी निर्णयांची मालिका थांबवा; अन्यथा रस्त्यावर उतरणार

## अनिल जगताप यांचा राज्य शासनाला इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**

गेल्या सहा महिन्यांपासून राज्य शासनाकडून शेतकऱ्यांविरोधात घेतले जात असलेले धोरणात्मक निर्णय अत्यंत घातक ठरत असून, त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. ही मालिका तात्काळ थांबवावी, अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा शेती अभ्यासक अनिल जगताप यांनी दिला आहे.




पत्रकारांशी बोलताना जगताप म्हणाले की, शासनाच्या निष्क्रीयतेमुळे शेतकरी आर्थिक संकटाच्या खाईत लोटले गेले आहेत. पिक विमा, मदत योजना, कर्जमाफी, बाजारभाव यामध्ये शेतकऱ्यांच्या हिताला पूर्णपणे तिलांजली देण्यात आली आहे. याचे गंभीर परिणाम लवकरच उघड होतील.

३० एप्रिल २०२४ चं पिक विमा परिपत्रकातशासनाच्या नव्या परिपत्रकामुळे शंभर रुपयांच्या नुकसानीवर केवळ २५ रूपये भरपाई मिळणार असून, धाराशिव जिल्ह्यातच १ हजार ६५० रूपये कोटींचे नुकसान झाले आहे.

१ रूपयात पिक विमा योजना बंद झाल्याने एकेकाळी १.६५ कोटी शेतकऱ्यांना कवच देणारी योजना रद्द झाली असून, यामुळे यंदा विमाधारकांची संख्या ८०-९० लाखांवर येणार आहे. याचा थेट परिणाम म्हणून शेतकऱ्यांचं संरक्षण धोक्यात आले आहे.

अतिवृष्टी व अवकाळी मदतीचे निकष बदल्यामुळे जिरायती शेतकऱ्यांसाठी आता केवळ ८ हजार ५०० रूपये प्रति हेक्टरची मर्यादित मदत तीही फक्त दोन हेक्टरपर्यंत दिली जात आहे.

सरकारने कर्जमाफीची अंमलबजावणी नाही, कांदा व दूध अनुदान रखडलेले, कीटकनाशके, खते, बियाण्यांचे दर अनियंत्रित, एसएसपी खरेदी व निर्यात धोरणात अस्थिरता, शेतीमालाला बाजारात कवडीमोल दर दिले आहेत.

गेल्या वर्षभरात धाराशिव जिल्ह्यात १७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असूनही शासनाने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही, ही शोकांतिका असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.



### आंदोलनाची घोषणा...

राज्य शासनाने त्वरित धोरण परिष्करण करावे, अन्यथा आम्हाला बळीराजाला घेऊन रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा शेवटी जगताप यांनी दिला. शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय होईपर्यंत लढा थांबवणार नाही, अशी भूमिका त्यांनी यावेळी स्पष्ट केली.

## पवनचक्कीची बेकायदेशीर कामे थांबविण्याची उपजिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ जून -**

वाशी तालुक्यात पवनचक्कीचा सुरू असलेला धुमाकूळ दिवसेंदिवस वाढत चालला आहे. या प्रकरणाला सामान्य नागरिक शेतकरी वैतागलेले आहेत. पवनचक्क्याकडून शेतकऱ्यासह महसूल विभागाला देखील गंडा घातला जात आहे. पवनचक्कीच्या विरोधात कोणी आवाज उठवल्यास पवनचक्की कंपन्याकडून गुन्हे दाखल करण्याची धमकी मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या रजाकरी प्रवृत्तीच्या पवनचक्की विरोधात भाजपचे वाशी तालुका सरचिटणीस सुधीर घोलप यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे धाव घेत विविध मागण्या पूर्ण होईपर्यंत वाशी तालुक्यातील पवनचक्कीचे सर्व कामे तात्काळ थांबवण्यात यावीत यासाठी निवेदन दिले आहे.

सुधीर घोलप यांनी निवेदनात म्हटले आहे, की वाशी तालुक्यात पवनचक्क्या कंपन्याकडून बेकायदेशीर कामे सुरू असून शेतकऱ्यासह प्रशासनाला विचारात न घेता मनमानी कारभार सुरू आहे. पवनचक्क्या कंपन्यांनी गावागावात दलाल नेमलेले आहेत. हे दलाल शेतकऱ्याच्या जमिनी कमी भावाने घेऊन मध्यस्थी करत पवनचक्क्या कंपन्यांना जास्त भावांमध्ये देत शेतकऱ्यांच्या पैशावर डल्ला मारत आहेत. सहा ते सात एकर जमीन २९ वर्षासाठी भाडे पट्ट्यावर घेऊन शेतकऱ्यांना फक्त २५ ते ३० लाख रुपये देत आहेत. शेतात विदुत पोल रोवण्यासाठी शेतकऱ्याला तुटपुंजिशी अशी मदत दिली जात आहे. कंपन्यांनी गावागावात गुंडांच्या टोळ्या तयार केल्या आहेत. या गुंडांच्या टोळ्या शेतकऱ्यांना दमदाटी करत आहेत. त्यामुळे सामान्य नागरिक, शेतकरी दहशतीमध्ये आहे. त्याचबरोबर पवनचक्क्या कंपन्याकडून शासनाचा लाखो रुपये महसूल बुडवला जात आहे. पवनचक्की उभा करताना तालुक्यातील लाखो झाडांच्या कत्तली केल्या आहेत. पवनचक्क्या कंपन्यांना असे का करतात विचारले असता पवनचक्क्याकडून गुन्हे दाखल करण्याची धमकी देखील शेतकऱ्यांना, नागरिकांना मिळत आहे. तसेच या प्रकरणांमध्ये प्रशासनातील अनेक अधिकारी देखील सामील असून हप्ते घेत आहेत. त्यामुळेच त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. तालुक्यातील हे प्रकार तात्काळ नाही थांबल्यास पवनचक्कीच्या विरोधात शेतकऱ्यांना, नागरिकांना एकत्र करून संविधानिक पद्धतीने जिल्हा स्तरावर उपोषण, आंदोलन करण्यात येईल.



तसेच पत्रात दिलेल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत तालुक्यातील सर्व पवनचक्कीची कामे थांबविण्यात यावेत असे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांना दिले आहे. आता जिल्हाधिकारी यावर काय कारवाई करतात हे पाहणे गरजेचे आहे.

## भाविकाची हरवलेली चांदीची छत्री स्वच्छता कर्मचाऱ्याच्या प्रामाणिकपणामुळे मिळाली परत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जून -**

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथून श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आलेले भाविक अथर्व चंद्रशेखर बेले यांची १५ तोळ्यांची चांदीची छत्री आज सकाळी कल्लोळ तीर्थात अंघोळ करताना पाण्यात पडली होती.

ही घटना घडल्यावर कर्तव्यावर असलेले स्वच्छता कर्मचारी सुरज क्षीरसागर यांनी तत्परता दाखवत पाण्यात उतरून ती छत्री शोधून काढली.



दर्शनासाठी गेलेले भाविक अथर्व बेले यांना बोलावून घेण्यात आले आणि ओळख पटवून त्यांच्या हाती ती चांदीची छत्री परत देण्यात आली.

यावेळी स्वच्छता पर्यवेक्षक राम धाकपडे उपस्थित होते. स्वच्छता कर्मचारी सूरज क्षीरसागर यांच्या प्रामाणिकपणाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्यांच्या या आदर्श कृतीमुळे तुळजाभवानी मंदिरातील सेवा व्यवस्था व लोकांच्या विश्वासाला बळ मिळाले आहे. यामुळे क्षीरसागर यांचे कौतुक होत आहे.

### बकरी ईदनिमित्त मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**

धाराशिव जिल्ह्यात दि.७ जून रोजी बकरी ईद (ईद-उल-अझहा) सण साजरा करण्यात येणार आहे. हा सण शांततेत व सुरळीत पार पडावा यासाठी सार्वजनिक शांततेच्या दृष्टीने धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी महत्त्वपूर्ण एक आदेश जारी केला आहे.

## मुख्यमंत्री प्रशासकीय सुधारणा मोहिमेंतर्गत परंडा तालुक्याने मारली बाजी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ जून -**

१०० दिवसांच्या मुख्यमंत्री प्रशासकीय सुधारणा मोहिम अंतर्गत गुणानुक्रमे परंडा पंचायत समिती कार्यालयाचा मराठवाडा विभागामध्ये प्रथम क्रमांक आला आहे. त्याअनुषंगाने ता.४ जून रोजी पंचायत समिती सभागृहामध्ये सर्व अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला.

दि.३० मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या समारंभात विभागाचे आयुक्त दिलीप गावडे यांचे हस्ते प्रशिस्तीपत्रक देऊन गटविकास अधिकारी मोहन राउत, प्रशासन अधिकारी अजयकुमार माळी, कृषी विस्तार अधिकारी सुरज बोडखे यांना गौरविण्यात आले.

यामध्ये पं.स. परंडा कार्यालयाचा मराठवाडा विभागामध्ये प्रथम क्रमांक आला आहे.

त्यानुसार त्यांनी संपूर्ण सादरीकरण हे शाश्वत विकास साध्यण्यासाठी राबविलेले विविध उपक्रमांचे सादरीकरण तयार केले होते.

इतर विभागांपेक्षा वेगळेपणा असल्याने विभागीय आयुक्त यांनी पं.स. परंडा कार्यालयास ७५ तालुक्यांमधून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

## नळदुर्ग येथे शांतता कमिटी बैठक : नियमांचे पालन करुन बकरी ईद साजरी करा



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ जून -**

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने दि.४ जून रोजी शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत पोलिस निरीक्षक सचिन यादव यांनी मुस्लिम बांधवांना शासनाच्या नियमांचे पालन करून शांततेत व उत्साहात बकरी ईद साजरी करण्याचे आवाहन केले.

नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या सभागृहात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलिस निरीक्षक सचिन यादव होते. प्रमुख उपस्थितींमध्ये शहेबाज काजी, आलेम मोहम्मद रजा, हाफेज सय्यद मैनोद्दीन जहागिरदार, हाफेज नियामतुल्ला इनामदार, मुश्ताक कुरेशी, फारूक अहेमद शेख, हाफेज बरकतअली मौजन, विनायक अहंकारी, शहर काजी सोहेब काजी, वसीम कुरेशी, खय्युम सुंबेकर, चांद कुरेशी, शाहेदाबी सय्यद, विलास येडगे, तसेच डॉ. रोहिणी धायगुडे, संध्या कुलकर्णी, आणि खलील शेख आदींचा समावेश होता.

# १६.५४ कोटींच्या पायाभूत कामांचा आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत शुभारंभ

## कौडगाव टेक्निकल टेक्स्टाईल पार्कला गती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**

राज्यातील पहिल्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कच्या उभारणीसाठी कौडगाव येथे महत्त्वपूर्ण आशा पायाभूत कामांचा सोमवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. १६ कोटी ५४ लाख रुपये खर्चून कौडगाव एमआयडीसीत रस्ते व अन्य मूलभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत. या उपक्रमामुळे एक निर्णायक पाऊल पुढे पडले असून, धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीचे नवे पर्व सुरू झाल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

कौडगाव एमआयडीसीत ३०८ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कसाठी एमआयडीसीमार्फत एकूण ११४ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये रस्ते, पूल, पाणीपुरवठा, पाइपलाइन, वृक्षारोपण व विद्युतीकरण आदी सुविधा समाविष्ट आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२.०७ कोटींचा रस्तेविकास व उर्वरित रक्कम इतर खर्चासाठी मंजूर करण्यात आले आहेत.

धाराशिव जिल्ह्यात २०१९ मध्ये महाजनादेश यात्रेदरम्यान झालेल्या जनसभेला संबोधन करताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौडगाव येथे टेक्निकल टेक्स्टाईल पार्कची घोषणा केली होती.

त्यानुसार 'केपीएमजी' या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेच्या माध्यमातून प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला. मात्र, त्यानंतरच्या उद्धव ठाकरे सरकारच्या कार्यकाळात प्रकल्प रखडला.सत्तांतरानंतर महायुती सरकार सत्तेवर येताच आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाला गती मिळाली.



उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत याची अधिकृत घोषणा केली असून, एमआयडीसीच्या माध्यमातून प्रकल्प उभारला जाणार असल्याची ग्वाहीही दिली आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यात प्रस्तवावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'टेक्निकल टेक्सटाईल मिशन'ची घोषणा केली. या निर्णयामुळे कौडगाव येथील टेक्निकल टेक्सटाईल पार्कच्या कामाला अधिक गती मिळणार असून, औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.धाराशिव-बार्शी रस्त्याचे काम वेगात सुरू आहे. तसेच कौडगाव एमआयडीसी परिसरात ५० मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प कार्यान्वित झाला आहे,

ज्यामुळे या भागात ऊर्जा सुरळीतपणे उपलब्ध होईल. रिलायन्सची गॅस पाईपलाईन या औद्योगिक परिसराजवळून जात असल्यामुळे या भागाला औद्योगिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

त्यामुळे अनेक उद्योजक येथे गुंतवणुकीसाठी उत्सुक असून, या प्रकल्पांच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट लवकरच साध्य होईल, असा ठाम विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

### जगप्रसिद्ध कंपन्यांसोबत राऊंड टेबल कॉन्फरन्स...

धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसी येथे प्रस्तावित टेक्निकल टेक्सटाईल पार्क मध्ये देशी व आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करण्याच्या उद्देशाने, एक विशेष राऊंड टेबल कॉन्फरन्स आयोजित करण्यात येत आहे. या परिषदेत तांत्रिक वस्त्रनिर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. तांत्रिक वस्त्रनिर्मितीत जगप्रसिद्ध असलेल्या असाही कासेई कॉर्पोरेशन (जपान), ड्यूपाँट डी नेमूर्स इंक. (अमेरिका), तेजिन लिमिटेड (जपान), एसआरएफ लिमिटेड (भारत), मिलिकेन अँड कंपनी (अमेरिका), फ्रॉइडेनबर्ग ग्रुप (जर्मनी), बेरी ग्लोबल ग्रुप (अमेरिका) किम्बर्ली-क्लार्क कॉर्पोरेशन (अमेरिका), आहलस्ट्रॉम-मुंक्षो (फिनलँड-स्वीडन), जॉन्स मॅनव्हिल (अमेरिका) या आघाडीच्या १० कंपन्यांशिवाय, २४ इतर नामांकित देशी व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनाही कौडगाव चखऊ येथील तांत्रिक वस्त्र पार्कमध्ये गुंतवणुकीसाठी सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. यात सहभागी कंपन्यांना कौडगाव एमआयडीसी येथे उभारण्यात येणाऱ्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्क अंतर्गत उपलब्ध भौगोलिक व औद्योगिक सुविधा यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नवीन बीओपीपी पॅकेजिंग उत्पादन लाइन सुरू

छत्रपती संभाजीनगर : कॉस्मो फर्स्ट, पॅकेजिंग, लॅमिनेशन, लेबलिंग आणि सिंथेटिक पेपरमधील आघाडीच्या कंपनीने औरंगाबाद, महाराष्ट्र येथे कंपनीच्या विद्यमान उत्पादन यंत्रसामग्रीत ४०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह नवीन बीओपीपी (बायअक्सिअली ऑरियंटेड पॉलीप्रोपिलिन) फिल्म लाइन यशस्वीरित्या सुरू करण्याची घोषणा केली आहे. नवीन लाइनमध्ये वार्षिक रेटेड क्षमता ८१,२०० एमटी असून जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध आहे. नवीन लाइनच्या चालू होण्यामुळे, कंपनीची वार्षिक बीओपीपी क्षमता सुमारे ४०% वाढून २,७७,००० एमटी होईल. गेल्या ६ वर्षांपासून कॉस्मो फर्स्टमध्ये १०% सीएजीआर दराने विक्री वाढते आहे. नवीन बीओपीपी लाइन कास्मोला विशेषतः चित्रपट आणि पॅकेजिंगमध्ये, आपल्या उत्पादन पोर्टफोलिओसाठी पुढील विस्तारासाठी समर्थन देईल. कंपनी प्रामुख्याने आपला चित्रपट उत्पादन पोर्टफोलिओ आणखी मजबूत करण्याची योजना खते आहे, ज्यामध्ये अनेक नवीन उत्पादने पाइपलाइनमध्ये आहेत, ज्यांचे लाँच आगामी तिमाहींमध्ये अपेक्षित आहे.

## नॅनो खतांची विक्री ४७% ने वाढली

संभाजीनगर : जगातील अग्रणी सहकारी संस्था असलेल्या इफकोने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रु. ३,८११ कोटी इतक्या करपूर्व नफ्याची (पीबीटी) म्हणून नोंद केली असून, नॅनो खतांच्या विक्रीत ४७% वाढ झाली आहे. या आर्थिक वर्षात (२०२४-२५) इफकोने नॅनो खतांच्या एकूण ३६५.०९ लाख बाटल्यांची विक्री केली, तर मागील आर्थिक वर्षात (२०२३-२४) ही संख्या २४८.९५ लाख होती. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये इफकोची एकूण उलाढाल रु. ४१,२४४ कोटी इतका नोंदविण्यात आली. इफकोचे अध्यक्ष श्री. दिलीप संघानी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, इफकोने घवघवीत वाढ नोंदवली असून, 'सहकार से समृद्धि' या स्वप्नाला मूर्त स्वरूप देत असल्याचा देशातील संपूर्ण सहकारी क्षेत्राला अभिमान वाटावा अशी ही कामगिरी आहे. ते पुढे म्हणाले की, सलग तीन आर्थिक वर्षांपासून संस्थेने रु. ३,००० कोटींपेक्षा अधिक नफ्याची नोंद केली आहे.

## एप्लास्टिक ॲनिमिया हा ॲनिमियाच्या इतर प्रकारांहून भिन्न का आहे

एप्लास्टिक ॲनिमिया ही रक्ताची एक अशी दुर्मिळ व्याधी आहे, ज्यात बोनमॅरोकडून विकृत स्टेम पेशी निर्माण केल्या जातात, जो बरेचदा कुटुंबांमध्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचतो व सर्वसाधारणपणे लहानपणी किंवा प्रौढपणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर त्याचे निदान होते. याउलट ॲनिमियामध्ये शरीर पुरेशा संख्येने पांढऱ्या पेशी (आरबीसी) तयार करण्यास असमर्थ असते. एप्लास्टिक ॲनिमिया हा फक्त 'ॲनिमिया' नव्हे, तर तो एक पॅन्सायटोपेनिया आहे, एक अशी वैद्यकीय स्थिती ज्यामुळे सर्व प्रकारच्या रक्तपेशींची संख्या लक्षणीयरित्या कमी होते, ज्यात अस्थिमज्जा म्हणजे बोन मॅरो निकामी झाल्याने ल्युकोपेनिया (पांढऱ्या पेशींचा अभाव), ॲनिमिया (आरबीसीची संख्या कमी असणे) आणि थ्रॉम्बोसायटोपेनिया (प्लेटलेट्सची संख्या कमी असणे) या तिन्ही स्थिती तयार होतात.

## फॉर्च्युनर आणि लिजेंडरच्या ४८व्ही व्हेरियंट्स लॉन्च

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज फॉर्च्युनर आणि लिजेंडर या दोन लोकप्रिय एसयूव्हींमध्ये नवीन निओ ड्राइव्ह श्रेणी सादर केली आहे. अत्याधुनिक ४८ वोल्ट सिस्टीमने सज्ज असलेले हे नवीन निओ ड्राइव्ह व्हेरियंट्स इंधन कार्यक्षमतेत सुधारणा, उत्कृष्ट ड्रायव्हिंग परफॉर्मन्स आणि अधिक आरामदायक अनुभव देतात व शहरी वाहतुकीपासून ते खडतर ऑफ-रोड परिस्थितींपर्यंत प्रवास अधिक सुलभ बनवतात.२००९ साली पदार्पण केल्यानंतर टोयोटा फॉर्च्युनरने प्रीमियम एसयूव्ही सेगमेंटमध्ये नवा बेंचमार्क निर्माण केला आहे. या वाहनाच्या बोल्ड डिझाइन, जबरदस्त परफॉर्मन्स आणि कुठल्याही प्रकारच्या रस्त्यावर सहज चालण्याच्या क्षमतेमुळे याला मोठी लोकप्रियता मिळाली आहे. वर्षानुवर्षे, शहरी साहसी लोकांपासून ते ऑफ-रोड प्रेमी पर्यंत, या एसयूव्हीने विश्वासू ग्राहकांचा मजबूत समूह तयार केला आहे. याचाच भाग म्हणून, स्टाईल आणि फिचर्सने भरलेली फॉर्च्युनरप्रमाणेच जोडीस जोड असलेली लिजेंडर ही कार देखील टोयोटाची गुणवत्ता(क्वालिटी), टिकाऊपणा(ड्युरॅबिलिटी), विश्वासार्हता(रिलायबलिटी) आणि कस्टमर सेन्ट्रिक इंनोव्हेशनवर आधारितच आहे.

## महाराष्ट्रात प्रजनन सेवांचा विस्तार

नाशिक- इंदिरा आईवीएफने नाशिक रोड येथे त्यांच्या नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे उद्घाटन केले आहे, ज्यामुळे महाराष्ट्रात समूहाचा विस्तार आणि उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे. हे नवीन केंद्र पहिल्या मजल्यावर, स्टार प्लस मॉल, एनएमसी ऑफिस समोर, दुर्गा गार्डन जवळ, बिटको पॉइंट, नाशिक रोड, महाराष्ट्र येथे आहे. नाशिक रोड हे इंदिरा आयव्हीएफचे महाराष्ट्रातील ३० वे क्लिनिक आहे, जे या वाढत्या प्रदेशातील लोकसंख्येला प्रजनन आरोग्य सेवा प्रदान करेल. उद्घाटन समारंभास पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, सिव्हिल सर्जन डॉ. चारूदत्त शिंदे, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ.तानाजी चव्हाण, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.जितेंद्र धनेश्वर, आयएमएचे राज्य उपाध्यक्ष डॉ.मंगेश थेटे, बिटको रुग्णालयाचे सल्लागार स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.प्रशांत शेटे, आयएमए नाशिक रोडचे अध्यक्ष डॉ.प्रशांत शेटे, नाशिक रोडचे अध्यक्ष डॉ. लोकवाणी आणि एनओजीएसच्या अध्यक्षा डॉ.नेहा लाड. या प्रसंगी बोलताना संदीप कर्णिक म्हणाले, इंदिरा आईवीएफचे नाशिक रोड क्लिनिक हे आपल्या प्रदेशातील आरोग्यसेवेत महत्त्वपूर्ण योगदान आहे. यामुळे विशेष प्रजनन आरोग्य सेवांची उपलब्धता वाढेल आणि स्थानिक लोकांना प्रजनन उपचार मिळण्यास सक्षम होईल, ज्यामुळे एकूणच सामुदायिक आरोग्य मजबूत होईल.

## आयशरने आयशर प्रो एक्स स्मॉल ट्रक्ससाठी नवीन डीलरशिपचे उद्घाटन केले

पुणे - आयशर ट्रक्स अँड बसेस (व्हीई कमर्शियल व्हेइकल्स लिमिटेडचे एक व्यवसाय युनिट) ने आज त्यांच्या नवीन, विशेष डीलरशिप 'चौगुले इंडस्ट्रीज प्रा. लि.' चे उद्घाटन केले. लि.' साठी सरिता विहार, दत्तवाडी, पुणे येथे आयशर प्रो एक्स स्मॉल ट्रक्स. ही नवीन ३एस डीलरशिप २५०० चौरस फूट क्षेत्रात पसरलेली आहे आणि आधुनिक डिजिटल नवोपक्रमासह 'जन्मजात डिजिटल' ग्राहकांना पहिला अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेली आहे.आयशरचे कस्टमर सर्व्हिस, रिटेल एक्सलन्स अँड नेटवर्क डेव्हलपमेंटचे ईव्हीपी रमेश राजगोपालन म्हणाले, पुणे हे वेगाने वाढणारे लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक केंद्र आहे. चौगुले इंडस्ट्रीजसह आयशर प्रो एक्स स्मॉल ट्रक्ससाठी आमच्या नवीन 'बॉर्न-डिजिटल' डीलरशिपचे उद्घाटन करताना आम्हाला अभिमान वाटतो. प्रमुख महामार्ग आणि औद्योगिक क्षेत्रांजवळ स्थित, ही आधुनिक ३ड सुविधा ई-कॉमर्स, एफएमसीजी, कुरिअर आणि औद्योगिक वस्तूंच्या वाहतुकीत गुंतलेल्या ग्राहकांसाठी भविष्यासाठी तयार उपाय प्रदान करेल.

## वेदांतूचा विद्यार्थी दक्षने पटकावला प्रथम क्रमांक

नाशिक - वेदांतू या जेईई तयारीसाठीच्या भारतातील आघाडीच्या शैक्षणिक व्यासपीठाने अत्यंत अभिमानाने जेईई ॲडव्हान्स २०२५ मधील त्यांच्या विद्यार्थ्यांची अप्रतिम कामगिरी जाहीर केली आहे. दरवर्षी अव्वल क्रमांक आणि सातत्याने चांगल्या निकालांसोबतच यंदाही वेदांतूने उच्च दर्जाचे, वैयक्तिक आणि परिणामांवर भर देणारे शिक्षण देण्याची आपली परंपरा कायम राखली आहे.लक्षणीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बेंगळुरुच्या दक्ष तयालिया याने गणितात पूर्ण १२० गुण आणि ऑल इंडिया रँक १५ मिळवत कर्नाटक राज्यात १ क्रमांक मिळवला आहे. वेदांतूच्या ३ वर्षांच्या लाँग टर्म बॅचचा विद्यार्थी असलेल्या दक्षने अखंड शिस्त, चिकाटी आणि या शिक्षण पद्धतीवर दाखवलेला विश्वास खरेच प्रेरणादायी आहे. वेदांतू कुटुंबासाठी आणखी एक अभिमानाची बाब म्हणजे गोरखपूरमधील प्रखर सिंग. लाँग टर्म बॅचचा विद्यार्थी असलेल्या प्रखरने एआयआर ९२ मिळवला आहे. ध्येयावर पूर्ण लक्ष केंद्रित करत प्रचंड मेहनत, लवचिकता आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे त्याने हे लक्षणीय यश प्राप्त केले आहे.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान; जरंडी ग्रामपंचायत मराठवाड्यात द्वितीय

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ जून : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायत मराठवाड्यात द्वितीय आली आहे सन-२०२३-२४ अंतर्गत राबविलेल्या या अभियानात जरंडी ग्रामपंचायतने घन कचरा,प्लास्टिक बंदी,यासह गावात स्वच्छता बाबत विविध उपक्रम राबविले आहे त्यामुळे मराठवाडा विभागात द्वितीय क्रमांक मिळाल्याचे मंगळवारी सुरेश बेदमुथा अप्पर आयुक्त (विकास) यांनी घोषित केलेल्या गुणानुक्रमे निकालात स्पष्ट केले आहे.तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतने ग्रामस्वच्छता अभियानात विविध नाविन्यपूर्ण



कामे गावात केली आहेत. यामध्ये प्लास्टिक बंदी सह गावात वैयक्तिक शौचालय, सार्वजनिक शौचालय,परसबाग,यासह इतर विविध उपक्रम राबविले आहेत या नाविन्यपूर्ण उपक्रमाची दि.२१ मे रोजी विभागीय आयुक्त विभागाचे पथकाने अंतिम पाहणी करून गुणानुक्रमे जरंडी ग्रामपंचायत मराठवाड्यात द्वितीय ठरली आहे यावेळी अंतिम पाहणीत

तपासणी पथकात जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तथा जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले,सहायक आयुक्त(विकास) उद्धव होळकर,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे कार्यकारी अभियंता महादेव कोळी,जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने,विस्तार अधिकारी दिलीप भूमरे,गट विकास अधिकारी दादाराव अहिरे जिल्हा कक्षाचे माहिती शिक्षण सल्लागार सतीश औरंगाबादकर क्षमता बांधणी तज्ञ राजेंद्र सोनवणे गट समन्वयक संतोष जाधव आदींनी अंतिम पाहणी केली होती त्यावर मंगळवारी निकाल घोषित करण्यात आला

सरपंच स्वाती दिलीप पाटील,उपसरपंच संजय पाटील,ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरूळे,माजी सरपंच वंदना पाटील,माजी पंचायत समितीचे सदस्य संजीवन सोनवणे, मधुकर सोनवणे,अमृत राठोड,बनेखा तडवी,कडूबा निकम,मधुकर पाटील, लिपिक संतोष पाटील, सतीश बाविस्कर आदींसह ग्रामस्थांनी निकाल घोषित होताच मंगळवारी रात्री आठ वाजता जल्लोष केला.

# सिल्लोडला सर्वाधिक १०.५७ हजार घरकुलांना मंजुरी

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.३, केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागासाठी १० लाख घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर केले. त्याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ५७ हजार ५९४ घरकुलला नव्याने उद्दिष्ट मंजूर झाले त्यापैकी सिल्लोड तालुक्याला जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच १० हजार ५७६ नवीन उद्दिष्ट आले असल्याची माहिती आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली. आज पुणे येथील बालेवाडी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमात याबाबत चे पत्र केंद्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपविण्यात आले असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.



'ड' यादीतील लाभार्थ्यांनी ग्राम पंचायत मार्फत पंचायत समिती कार्यालयात संचिका सादर कराव्यात - आमदार अब्दुल सत्तार यांचे अवाहन

घरकुलाचे जिल्ह्यात सर्वाधिक उद्दिष्ट सिल्लोड ला मिळाल्याने तालुक्यातील 'ड' यादीतील प्रत्येक गावातील पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ मिळणार असून 'ड' यादीतील लाभार्थ्यांनी ग्राम पंचायत मार्फत पंचायत समिती कार्यालयात संचिका सादर कराव्यात जेणे करून पंचायत समितीला तात्काळ संचिका मंजूर करून पात्र लाभार्थ्यांना लाभ देता येईल असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

जिल्ह्यात सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर केल्याने आमदार अब्दुल सत्तार यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्री ना.शिवराज सिंग चौहान, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री ना.जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांना धन्यवाद देऊन आभार मानले. तालुक्यात पहिल्या टप्प्याची घरे पूर्ण करीत असतांना शासनाने १० हजार ५७६ घरकुलांना नव्याने मंजुरी दिली असल्याने जुन्या 'ड' यादीपैकी एकही पात्र लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खालील प्रमाणे मिळाले नवीन उद्दिष्ट

छत्रपती संभाजीनगर - ३४७४, गंगापूर - ८७१९, कन्नड - ७४४९, खुलताबाद - १७२८, पैठण - ७७४४, फुलंब्री - ४४४३, सोयगाव - ३३६३, वैजापूर - १००९८, सिल्लोड - १०५७६.

# सिल्लोड येथे हिंदू तरुणावर मारहाण झाल्याच्या निषेधार्थ लिहाखेडी येथे रास्ता रोको आंदोलन

लिहाखेडी सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथे छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर (ता.०३) सकाळी नऊ वाजता जाहीर निषेध करण्यात आला. सिल्लोड शहरातील मुख्य रस्त्यावर हातगाडीवाल्यांनी किरकोळ कारणावरून एका हिंदू युवकाला (ता.३०) शुक्रवार रोजी रामेश्वर मोरे यांना मारहाण केली होती त्यामुळे हे आंदोलन करण्यात आले.

स्वामी सर्वानंद महाराज यांच्या नेतृवाखाली सकाळी नऊ वाजता लिहाखेडी येथे जळगाव महामार्गावर जमले. यावेळी गणेश बनकर, सुनील भोकरे, विनोद चव्हाण, प्रा



शिवराम साखळे, हरिदास साखळे, अंबादास सपकाळ, संजय डमाळे, द्वारकादास पंडित, विष्णू फरकडे, गणेश वराडे, दादाराव गोरे, भाऊसाहेब उबाळे, गणेश गायकवाड, बाजीराव डापके, दीपक काळात्रे, संतोष डापके,रमेश नवल, सुभाष नवल, नागेश नवल, सुनील साखळे, विष्णू गव्हाणे, भाऊसाहेब मोरे सिताराम मोरे, गजानन लोखंडे, भागाची डफळ, अजय हिवाळे, रोहित आठवडे, नागेश शेवाळे, कृष्णा तात्या फरकाडे, आत्माराम फरकाडे, अंबादास हिवाळे, विशाल मुरकुटे, गणेश बावस्कर, विशाल साखळे, अक्षय साकळे, यावेळेस बंदोबस्त साठी अजिंठा पोलीस स्टेशनचे निरीक्षक अमोल ढाकणे कर्मचारी उपस्थित होते.

आंदोलकांच्या मागण्या

संबंधित आरोपीवर मोक्का अंतर्गत कार्यवाही करण्यात यावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते मुख्य रस्त्यावरील हातगाड्या, फळविक्रेत्यांची दुकाने अवैध वाहने यांनी कायम स्वरूपी रस्त्यावर मानाई करण्यात यावी, गुन्ह्यातील सर्व आरोपींना आटक करून कठोर कारवाई करण्यात यावी.

हिंदू समाजावर कोणीतरी अत्याचार केला तर जसे तसे उत्तर दिले जाईल, असे सामाजिक कार्यकर्ते एकनाथ हिवाळे यांनी यावेळी म्हटले आहे.

# श्रृत पंचमी निमीत्त राजाबजार जैन मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे श्रृत पंचमी महोत्सव निमीत्त विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम सकाळी ७ वाजता विविध धार्मिक ग्रंथांना सजवुन ते शीर्षस्थानी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. हि शोभायात्रा राजाबजार जैन मंदिर, शहागंज, संस्थान गणपती मार्गे मंदिरात विसर्जीत करण्यात आली. शोभायात्रेत महिलांनी पांढ-या साडया तर पुरैषांनी सोहळयाचे वस्त्र परिधान केले होते. तदनंतर मंदिरात भगवान शांतीनाथांच्या व सरस्वती ग्रंथाचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी शांतीमंत्राचे पठण करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत महिलांनी व पुरैषांनी षटखंडागम, महापुराण, पदमपुराण, जैन सिध्दांत कोष, भगवान महावीर



पुराण, २४ तिर्थंकर पुराण, पुजन पाठ प्रदिप, मंगल आराधना, कडवे प्रवचन आदी धार्मिक ग्रंथ घेवुन पुढे चालत होत्या. शोभायात्रेत धार्मिक घोषणा देवुन संपुर्ण परिसर धर्ममय झाला होता.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, पंचायत सचिव प्रकाश अजमेरा, कीरन पहाडे चंदा कासलीवाल, मयुर ठोले, प्रेमचंद पाटणी, पूष्पा पहाडे कांताबाई पहाडे, माणिकचंद पांडे, ज्योत्स्ना पहाडे, स्वाती कासलीवाल, प्रकाश कासलीवाल, अनिला ठोले, काश्मीरा लोहाडे, राजाभाउै पहाडे, भरत पापडीवाल, संतोष बाकलीवाल, कनक ठोले, सुनिता पाटणी, चंदा काला, उषा चुडीवाल, नुतन गंगवाल, आदीत्य सोनी मनोज कासलीवाल श्रीपाल लोहाडे, लता साहुजी, संगीता सेठी, निलेश अजमेरा यांच्यासह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# हिंदू समाजातील सर्व जातीसाठी १० दिवसाचे निवासी निःशुल्क पुरोहित प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

## वि.हिं.प.मंदिर अर्चक पुरोहित आयाम अ.भा. पुरोहित महासंघ व केशव माधव चतुर्वेद पाठशाळेचा स्तुत्य उपक्रम

छत्रपती संभाजीनगर : मंदिरे आणि देवांशी भाविकांचे नाते जोडणारे आर्चक पुरोहित यांचे हिंदू संस्कृतीमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे एका विशिष्ट उद्देशाने आमच्या ऋषीमुनींनी या दोन सामाजिक रचनांची निर्मिती केली आणि त्यांनी आत्तापर्यंत प्रभावीपणे बजावली त्यामुळे हिंदुत्वाचा प्रवाह सहज अखंड प्रवाहित राहिला हा प्रवाह असाच पुढे कायमस्वरूपी चालू राहावा या दृष्टिकोनातून हिंदू समाजातल्या विविध जातीतून पुरोहित तयार व्हावे यासाठी विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम अखिल भारतीय पुरोहित महासंघ आणि केशव माधव चतुर्वेद पाठशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जून ते २७ जून २०२५ या कालावधीत दहा दिवसाचे पुरोहित प्रशिक्षण शिबिर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील दयानंद सेवा आश्रम केशव माधव चतुर्वेद पाठशाळा निपाणी रोड आडगाव येथे ठेवण्यात आले आहे

हे पुरोहित प्रशिक्षण शिबिर पूर्णपणे निःशुल्क आणि निवासी असून या शिबिरात पौरोहित्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींचे प्रशिक्षण पैठणचे कमलाकर शिवपुरी गुरुजी देणार आहेत

प्रशिक्षण घेण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी नाव नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक १० जून २०२५ असून ज्यांना नाव नोंदणी करावयाची आहे त्यांनी आनंदीदास रहाटीकर , प्रकाश कहाळेकर , गौरव गुरुजी , राजेंद्र पाथरीकर ,

यांच्याकडे आपली नावे नोंदवावी असे आवाहन राजीव जहागीरदार आनंदीदास रहाटीकर योगेश पाठक पंडित मुकुंद खोचे घनपाठी राजेशजी क्षीरसागर पंडित मेघराज भुने पंडित विनायक फुलंब्रीकर डॉक्टर लक्ष्मण आर्य यांनी केले आहे.

## एमजीएममध्ये मोफत फोटोग्राफी कार्यशाळेचे आयोजन; वाईल्डलाईफ फोटोग्राफर बैजू पाटील यांचे मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर, दि.४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या फोटोग्राफी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी शुक्रवार, दिनांक ६ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मोफत फोटोग्राफी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत जागतिक ख्यातीचे वाईल्डलाईफ फोटोग्राफर बैजू पाटील 'बेसिक्स ऑफ फोटोग्राफी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या वर्कशॉपमध्ये विद्यार्थ्यांना फोटोग्राफीच्या मूलभूत संकल्पना समजावून सांगण्यात येणार असून फोटोग्राफी क्षेत्रातील करिअरच्या संधी, विविध अभ्यासक्रम तसेच एमजीएम विद्यापीठातर्फे उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्तीविषयी सविस्तर माहिती दिली जाणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या फोटोग्राफी विभागाने विद्यार्थ्यांसाठी ही एक विशेष संधी उपलब्ध करून दिली असून या क्षेत्रात करीयर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी या मोफत कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ८७६७८७५२५८, ९९७०८५१३१६ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

## माहेश्वरी बाई बेटी संमेलनात लेकींचे कौतुक



पैठण दि ०४ : पैठण माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने पैठण शहरातील लेकींच्या संमेलनाचे आयोजन माहेश्वरी भक्तनिवास येथे करण्यात आले. या संमेलनात राज्यातील तसेच पर राज्यातील मुली आपल्या जुन्या मैत्रिणींना भेटण्यासाठी सहभागी झाल्या होत्या या संमेलनामध्ये २० ते ८५ वय असलेल्या लेकी सहभागी झाल्या होत्या.या आगळ्या वेगळ्या संमेलनात सहभागी समस्त लेकींचे कौतुक करण्यात आले. संमेलनाच्या उद्घाटनासाठी प्रमुख अतिथी मधुसूदन गांधी अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा, सौ सुनीता पल्लोड अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी महिला संघटन, सत्यनारायण सारडा मंत्री महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा, सौ सुनीता चरखा सचिव महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी महिला संघटन, दिनेश सोमानी, श्रीमती सूर्यमाला मालानी व विशेष अतिथी जिल्हाध्यक्ष शामसुंदर सोमानी व सौ मनीषा तोतला, अजित नावंदर, अर्चना भट्टड व दिलीप सोनी यांच्या उपस्थितीत सर्वप्रथम महेश भगवान च्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून संमेलनात तीन आपत्ती असलेल्या १३ महिलांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

## भदंत एस. प्रज्ञाबोधी ( महाथेरो ) यांचा कार्य कर्तृत्व संघर्ष गौरव सोहळा



खुलताबाद प्रतिनिधी ऐतिहासिक बुद्धभूमी मावसाळा येथील विहाराचे मुख्य संस्थापक अध्यक्ष भदंत एस. प्रज्ञाबोधी ( महाथेरो ) यांनी अगदी बाल वयामध्ये १९८९ साली बौद्ध भिक्खूंची दीक्षा घेऊन अगदी बाल वयापासून धम्मकार्य करीत करीत मागील पंचवीस वर्षापासून ऐतिहासिक बुद्धभूमी मावसाळा येथे बौद्धधम्म परिषदेचे आयोजन करून या बुद्धभूमीला देश विदेशातील बौद्ध धम्मगुरु उपासक-उपासिका भेट देऊन आनंदित होतात खेड्यापाड्यातील उपासकांना धम्म उपदेश याद्वारे धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अविरतपणे रात्रंदिवस प्रवास करून धम्मज्ञानाची ज्योत जलसामान्य पर्यंत पोहोचविण्याचे कठीण आणि महान कार्य भदंत एस. प्रज्ञाबोधी ( महाथेरो ) यांनी अविरत पणे केले असून सुरुवातीला बुद्धभूमी मावसाळा येथे समाजकंटकांकडून अनेक प्रकारच्या त्रास सहन करून धम्मकार्य करून ऐतिहासिक बुद्धभूमी मावसाळा येथे पाच एकर जागेवरती अतिशय नंदनवन बनवले आहे या बुद्धभूमीला तथागत भगवान बुद्धांच्या अस्थिधातू व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलश या ठिकाणी प्राप्त करून या बुद्धभूमीला एक जिवंत रूप प्राप्त करून दिले आहे.तो संघर्ष सर्वसामान्य जन पर्यंत जावा या उद्देशाने भदंत एस. प्रज्ञाबोधी ( महाथेरो ) यांचा कार्य कर्तृत्व संघर्ष सोहळा संपूर्ण मराठवाडा लेवलवर भारतरत्न मौलाना आझाद सभागृह टीव्ही सेंटर मजनू हिल गार्डन छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक ६ जून २०२५ रोजी दुपारी १: वा. संपन्न होणार आहे या कार्यक्रमाला पूज्य भदंत सागरबोधी, पूज्य भदंत राजरत्न ( अंबड ), पूजा भदंत करुणा बोधी, पूज्य भंते अत्तदीप, पूजनीय आर्या अभीधम्माजी, पूजनीय भिक्खू संघ मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत तसेच जपान येथील जागतिक कीर्तीचे धम्मगुरु कोटा नोगुची यांचे सुद्धा मार्गदर्शन लाभणार आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ माननीय एस.आर. बोदडे हे राहणार असून प्रमुख पाहुणे प्रकाश दादा निकाळजे ( माजी उपमहापौर ) दौलत दादा खरात ज्येष्ठ नेते आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

## सिनेतारका मोनी रॉय यांच्या हस्ते सागर जाधवांचा सन्मान



सोयगाव,दि.४ जून : जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड या संस्थेने ग्रामीण भागातील शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात केलेल्या उलेखनीय कार्याची नोंद राष्ट्रीय स्तरावर घेऊन रिसिल संस्थे तर्फे राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कार्य करणा-या संस्था व व्यक्तींना देण्यात येणारा नॅशनल आयकॉन वर्ष २०२५ हा पुरस्कार ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था श्रेणीत जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ यांना राष्ट्रीय आयकॉन पुरस्कार २०२५ ने गानसम्राज्ञी लता मंगेशकर सभागृह मुंबई येथे २९ मे२०२५ रोजी प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री मोनी रॉय,युको बँकेचे एम डी अमलेश त्रिपाठी,रिसिलचे अध्यक्ष सुधीर पठाडे व उद्योगप्ती सतीश कल्याणक यांच्या हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. यावेळी गजानन पठाडे व अन्य मान्यवराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रियलमी जीटी ७ सीरीज लाँच

छत्रपती संभाजीनगर, २९ मे २०२५ : भारतीय तरुणांमध्ये सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमी ने आज पॅरिसमध्ये जागतिक लॉन्चसह रियलमी जीटी ७ मालिका भारतात सादर केली. त्यांचा सर्वात रोमांचक स्मार्टफोन रियलमी जीटी ७ ड्रीम एडिशन आहे, जो ॲस्टन मार्टिन फॉर्म्युला वन टीमच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे, जो पहिला अधिकृत एएमएफ १ सह-ब्रँडेड स्मार्टफोन आहे. रियलमी जीटी ७ मालिका अत्याधुनिक वैशिष्ट्यांसह आणि कार्यप्रदर्शन अपग्रेडसह भारतीय वापरकर्त्यांसाठी फ्लॅगशिप स्मार्टफोन अनुभवाचे रूपांतर करत आहे, जे रिअलमीचे आतापर्यंतचे सर्वात धाडसी पाऊल आहे.ॲस्टन मार्टिन फॉर्म्युला वन टीमच्या सहकार्याने ड्रीम एडिशन लाँच करून, एआय प्लॅनर सादर करून आणि आइस सेन्स ग्राफीन कूलिंग सारख्या नवकल्पनांचा परिचय करून सीमा ओलांडत राहिलो आहोत. जीटी ७ मालिका ही अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रीमियम अनुभव जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी एक धाडसी पाऊल आहे, ज्यामुळे त्यांना अंतिम कामगिरीचा अनुभव घेता येईल.

## सोनू आहिरे यांचे निधन



सोयगाव,दि.४ जून : येथील सोनू राजेंद्र आहिरे (वय.३३)यांचे मंगळवार रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी ४:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आजोबा,आई, वडील,काका,काकू,पत्नी,एक मुलगा,असा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आहिरे यांचा तो मुलगा होत.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# दहशतवादी 'घरां'ना हादरे...

सोमवार, २ जून २०२५ च्या पहाटे ४ वाजता महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (अँण्टी टेररिझम स्क्वाड म्हणजेच 'एटीएस') २५० पेक्षा अधिक पोलिसांसमवेत भिवंडी, पडघा, बोरिवली परिसरात एकाचवेळी २२ घरांवर छापेमारी केली आणि १२ जणांना ताब्यात घेतले. स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या भारत सरकारकडून बंदी घालण्यात आलेल्या संघटनेशी संबंधित साकिब नाचन व इतर संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. साकिब नाचन हा पूर्वीपासूनस सिमीचा सदस्य होता. २००२ आणि २००३ मधील मुंबई रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात शिक्षा भोगलेला दहशतवादी आहे. तसेच २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना 'आयएसआयएस'शी संबंध असल्याच्या आरोपावरून संदर्भात अटक झालेला साकिब हा आयएसआयएसच्या महाराष्ट्र नेटवर्कचा 'अमीर-ए-हिंद' असण्याचा संशय आहे. त्याच्यासोबतच अकिब साकिब नाचन, अब्दुल लतिफ कासकर, कैफ नाचन आणि शाजिल नाचन यांच्यासह सिमीच्या माजी पदाधिकारी आणि सदस्यांची घरे या छापेमारीचे लक्ष्य होते. भारतातून पळून गेलेला उच्चविद्याविभूषित दहशतवादी डॉ. झाकिर नाईक याची ही पिलावळ असण्याची दाट शक्यता आहे. या कारवाईत झडती घेतल्या गेलेल्या २२ पैकी बहुतेक घरांमध्ये शस्त्रे, संशयास्पद डिजिटल साहित्य, दस्तावेज आणि दहशतवाद व कट्टरतावादाला उत्तेजन देणारी आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली आहेत. अतिशय धक्कादायक म्हणजे सध्या इस्रायलविरुद्ध जिहाद पुकारलेल्या 'हमास' या जगभरातील कुख्यात दहशतवादी संघटनेचे झेंडे या घरांमध्ये सापडले आहेत. ही कारवाई फक्त गुन्हेगारी विरोधातच नव्हे, तर संभाव्य भविष्यकालीन संकटांविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून करण्यात आली आहे. पहलगामचा दहशतवादी हल्ला, अशा दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या काही स्थानिक देशविघातक शक्तींवर वेळीच प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली आहे. देशाविरुद्ध संभाव्य कटकारस्थान तसेच देशाच्या एकता, अखंडता आणि सुरक्षेस संभाव्य धोक्यापासून तत्काळ दूर करणे हे कायदा आणि सुव्यवस्था अखंडित राखण्याकरिता अत्यावश्यक होते. साकिब नाचन हा २००२ व २००३ मधील मुंबईत झालेल्या आणि १२ जणांचा बळी घेणाऱ्या तीन बॉम्बस्फोटांसाठी जबाबदार होता. लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेच्या सहकाऱ्याने हे स्फोट घडवून आणल्याप्रकरणी तो दोषी आढळला होता. त्यात त्याला १० वर्षांची शिक्षा झाली आहे. त्यापूर्वी गुजरातमध्ये १९९१ च्या दहशतवादी हल्ल्यात साकिबला पहिल्यांदा अटक करण्यात आली होती. त्यात सुरुवातीला त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. ती नंतर सर्वोच्च न्यायालयाने १० वर्षे कमी केली. (हे असे कसे आणि का होत असावे?) सध्या साकिब हा केंद्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) ताब्यात आहे.

हा साकिब गेल्या अनेक वर्षांपासून पडघा या गावाला 'इस्लामिक राज्य' म्हणून घोषित करण्याच्या प्रयत्नात आहे. २०२३ मध्ये त्याला केंद्रीय तपास यंत्रणेने याच कारणावरून अटकही केली होती. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने भारतात आपले 'स्लीपर सेल' सक्रिय केले आहेत. त्याच्याशी साकिब नाचनसह पडघा या गावातील इतरांचेही धागेदोरे जुळत आहेत. ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यापासून पडघा गावावर बारीक नजर ठेवण्यात आली आहे. तेथे आपल्या गुप्तचरांचे नेटवर्क सक्रिय करण्यात आले आहे. दुसरे म्हणजे, ठाणे जिल्हा मुख्यालयापासून ३५ किमी असलेल्या भिवंडी तालुक्यातील बोरिवली आणि पडघा ही गावे मुस्लिमांचेच प्राबल्य असलेली आहेत. सिमी संघटनेचे अनेक दहशतवादी या गावांना भेट देत असत. २००२-२००३ मध्ये मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन, विलेपार्ले आणि मुलुंड येथे झालेल्या बॉम्बस्फोटात सामील असलेला साकिब नाचन हा याच गावचा रहिवासी आहे. सुमारे ७००० लोकसंख्या असलेल्या पडघा या गावात ९० टक्के मुस्लिम आहेत. या कारवाईत छापे मारण्यात आलेल्यांमध्ये मालमत्ता दलाल आणि सिमीचा सदस्य ६० वर्षीय फराक झुबैर मुल्ला याचेही घर होते. त्याचा मोठा भाऊ हसीब हा मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपी होता. तो १० वर्षांची शिक्षा भोगून सध्या दिल्लीत साकिबसोबत तुरुंगात आहे. मुंबई भारताचे आर्थिक हृदयस्थान असून, अनेक स्वप्नांचे माहेरघर आहे. या शहरावर वेळोवेळी दहशतीचे ढग जमा झाले. भारतातील सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला याच शहराने झेलला. २६ विदेशी, पन्नासेक मुसलमान आणि शंभरेक हिंदू अशा पावणेदोनशे निष्पाप आणि निरपराध माणसांचा बळी घेणारी '२६/११' या नावाने ओळखली जाणारी घटना याच मुंबईने भोगली आहे. या मुंबईवरील हल्ल्यानंतर दहशतवादविरोधी कार्यक्षम यंत्रणा आवश्यक वाटू लागली आणि २०१० मध्ये महाराष्ट्र एटीएसचे पुनर्गठन करण्यात आले. आज, ही संस्था एक केंद्रीकृत व प्रादेशिक मिश्र मॉडेलमध्ये कार्य करते. याचे मुख्यालय मुंबई असून छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, ठाणे या ठिकाणी कार्यालये आहेत. दहशतवादाविरुद्धच्या संघर्षातील दृढ वज्रकवच आणि अंधाराशी झुंजणारे प्रहरी अशी ख्याती मिळवलेल्या महाराष्ट्र एटीएसने अनेक महत्त्वाच्या कारवाया वेळीच करून अनेक अप्रिय घटना टाळण्यात यश मिळविले आहे. त्यात २००६ च्या औरंगाबाद बॉम्बस्फोटांच्या वेळी महाराष्ट्र एटीएसने वेळीच कारवाई करत ४० किलो आरडीएक्स आणि शस्त्रास्त्रे जप्त केली आणि एक मोठा हल्ला टाळला. २०१२ मध्ये इंडियन मुजाहिद्दीनच्या पुणे नेटवर्कला मिळणारा पैसा आणि लॉजिस्टिक नेटवर्कचा पर्दाफाश करत अनेक अतिरेक्यांना अटक केली. २०१७-१८ मध्ये इसिस ऑनलाईन भरती प्रकरणात समाज माध्यमांद्वारे भरतीला रोखून २५ हून अधिक तरुणांना मुख्य प्रवाहात परत आणले. २०१९ च्या मुंबई मॉल बॉम्ब अफवांना जलद तपासाद्वारे थांबवून ती अफवा असल्याचे पटवून देत सामान्य जनतेचा विश्वास टिकवला.

ठाणे येथील परवाची कारवाई एटीएस ही महाराष्ट्राच्या सुरक्षेसाठी एक निष्ठावान, आधुनिक आणि समर्पित यंत्रणा आहे, हे सिद्ध करणारी आहे. अशा संस्थांचे बळकटीकरण आणि विश्वासार्हता केवळ राज्यासाठीच नव्हे तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचा टप्पा आहे. सतर्कतेची ही मशाल अखंड तेवत ठेवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राची साथ गरजेची आहे, असे एटीएसच्या एका महत्त्वाच्या अधिकाऱ्याने बोलूनही दाखविले आहे. एक प्रबुद्ध, सहिष्णू आणि जबाबदार समाज हा एटीएससाठी सर्वोत्तम भागीदार ठरू शकतो, असेही ते म्हणतात. समाजाने महाराष्ट्र एटीएसच्या पाठीशी उभे राहण्याची आजच्या परिस्थितीत गरज आहे. दहशतवादाविरुद्धचा लढा फक्त सुरक्षा यंत्रणांचा आहे असे मानून चालणार नाही. सामान्य नागरिक, शैक्षणिक संस्था, माध्यमे आणि धार्मिक नेते अशा प्रत्येकाचा त्यात सहभाग आवश्यक आहे. संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देणे, तरुणांना अतिरेकी विचारसरणीपासून दूर ठेवणे, धार्मिक सहिष्णुतेचा प्रचार करणे ही महाराष्ट्र एटीएसची येथील जनतेकडून अपेक्षा असून, ती वेळोवेळी वेगवेगळ्या प्रसंगांतून उजागरही झाली आहे. २००८ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर २०१० मध्ये पुनर्गठन करण्यात आलेल्या दहशतवाद विरोधी पथकाची (एटीएस) निर्मिती महाराष्ट्र सरकारच्या अख्त्यारीतच करण्यात आली आहे. या एटीएसला केंद्र सरकारचे पूर्ण पाठबळ असले तरी ते सक्रिय करणे, सक्रिय ठेवणे, वेळप्रसंगी त्यांना धडाकेबाज कारवाई करण्यासाठी मोकळीक देणे हे महाराष्ट्र सरकारच्या इच्छाशक्तीवरच अवलंबून असते. ही इच्छाशक्ती दाखवणारे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री त्यासाठी महाराष्ट्रात असावे लागतात. त्या 'दबंग आणि धडाडीच्या' मानसिकतेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर आहेतच, पण महाराष्ट्रातील जनतेच्या सुदैवाने ते स्वतःच गृहमंत्री पण आहेत. ठाणे जिल्ह्यातील 'अशा' दहशतवादी 'अस्तनीतील सापां'ना बिळातून कसे बाहेर काढायचे हे ते उत्तम रीतीने जाणतात. हे सुदैवच म्हणावे लागेल महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे..!

## विशेष

# प्रतिमा सक्षम, सुदृढ भारताची

प्रा. सुखदेव बखळे

भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे केलेल्या कामगिरीची देशातच नव्हे तर जागतिक पातळीवरही मोठी चर्चा झडली. 'ऑपरेशन सिंदूर' थांबले नसून यापुढेही सुरू राहील, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. हे ऑपरेशन बंद करत आहोत, असे पंतप्रधानांनी म्हटलेले नाही. उलटपक्षी, आता हा भारताच्या रणनीतीचा एक भाग असल्याचे स्पष्ट करत त्यांनी पाकिस्तानला योग्य तो संदेश दिला आहे. ही मोहीम बंद करण्याचे सूचित केले असते, तर पाकिस्तानशी भारताचे संबंध सुधारत असल्याचे निदर्शक मानले गेले असते. म्हणूनच ही कारवाई वा धोरण सुरू ठेवत भारताने दहशतवादाविरुद्ध आपली खंबीर भूमिका जगापुढे मांडली आहे. त्याचे परिणाम येत्या काळातही बघायला मिळतील. भारताच्या या नीतीमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल वा काही गोष्टींची, धोरणांची भर येत्या काळात बघायला मिळू शकते. जसे की, दहशतवाद्यांना चोख उत्तर देण्यासाठी लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रे डागून आपण त्यांचे तळ उद्ध्वस्त केले. नंतर भारताच्या प्रतिनिधी मंडळाने जगभरातील देशांना भेट देत आपली या ऑपरेशनसंदर्भातील भूमिका स्पष्ट केली. या प्रतिनिधी मंडळात देशातील सर्व राजकीय पक्षांतील प्रतिनिधींचा समावेश बघायला मिळाला. पाकिस्तानने भारताविरुद्ध काय केले आणि भारत काय करत आहे, हे त्यांनी सप्रमाण सांगितले. या सगळ्यातून पाकिस्तानमध्ये आश्रय घेणाऱ्या दहशतवाद्यांविरुद्ध जगभरात एक मोहीम सुरू करत असल्याची भारताची भूमिका स्पष्ट झाली आहे. जगाच्या पटलावर अशा ठोस आणि पारदर्शी भूमिकेचा चांगला प्रभाव बघायला मिळत असून अनेक देश भारताला समर्थन देताना दिसत आहेत.

ताज्या कारवाईमध्ये भारतात तयार झालेले ड्रोन्स आणि अन्य साधनांनी पाकिस्तानमध्ये लपलेल्या दहशतवाद्यांचे अड्डे, वसतिस्थाने भुईसपाट करण्याची जबाबदारी चोख बजावली. या हल्ल्यामध्ये त्यांचे मोठे नुकसान झाले. हे सर्व बघितल्यानंतर आता भारतात तयार होणाऱ्या शस्त्र आणि क्षेपणास्त्रांची मागणी जगभरात वाढू लागली आहे. आपली विमाने आणि क्षेपणास्त्रांनी अचूक नेम साधत लक्ष्यापर्यंत पोहोचण्यात मिळविलेले यश पाहून जगातील अनेक देश आता भारताचे याबाबतचे तंत्रज्ञान विकत घेऊ पाहात आहेत. हा महत्त्वाचा भागही लक्षात घ्यायला हवा. पाकिस्तानचा कांगावा, त्याचा खोटारडेपणा वारंवार समोर आला आहे. आपण भारताची विमाने पाडल्याचा त्यांचा दावा जगाने ऐकला. मात्र भारताच्या सेनाध्यक्षांनी, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफने तसेच खुद्द पंतप्रधानांनीही हे अमान्य केले आहे. विमानांचे काही प्रमाणात नुकसान झाले असले, तरी लगेचच त्यातील त्रुटी दूर करून आपण हल्ले केल्याचे अलिकडचे त्यांचे प्रतिपादन जगासमोर आहे. या सगळ्या स्पष्टतेमुळे अमेरिकेतील सर्व पक्षांचे प्रमुख भारताला पाठिंब्याचे निवेदन देत आहेत. पाकिस्तानच्या भूमिकेबद्दल त्यांच्या मनात शंका आहे. ते ती बोलूनही दाखवत आहेत. त्यातच जगभर आपली भूमिका स्पष्ट करणाऱ्या प्रतिनिधी मंडळालादेखील चांगला प्रतिसाद मिळतो आहे. काही देशांनी तर पाकिस्तानने आपल्याला चुकीची माहिती पुरवली असून आता सत्य समोर आल्याचे निवेदन दिले आहे.

एव्हाना या हल्ल्यामध्ये नुकसान झाल्याबद्दल पाकिस्तानप्रती संवेदना व्यक्त करणारे निवेदनही काही देशांनी मागे घेतले आहे. पाकिस्तानची कृती चुकीची असल्याचे आम्ही घोषित करतो, असे म्हणत त्यांनी भारताला पाठिंबा दिला आहे. स्वाभाविकच भारताचे अन्य देशांशी असणारे संबंध दृढ होण्याच्या दृष्टीनेही या सगळ्याची मदत होईल. भारत हा दहशतवाद्यांविरुद्ध वेगवान कारवाई करणारा पहिला देश ठरला आहे. अगदी अलिकडचा काळ लक्षात घेतला तरी रशिया आणि युक्रेनमधील तणाव तीन वर्षांनंतरही संपुष्टात आलेला नाही. इस्रायल आणि हमासमधील संघर्षही धुमसत आहे. आपण मात्र केवळ सहा दिवसांमध्ये हा संघर्ष संपवून टाकला. यावेळीही आपण दहशतवाद्यांना थारा देणाऱ्या देशातील लष्करी आस्थापनांना नव्हे, तर दहशतवादी केंद्रांना लक्ष्य केले. तेथील नागरिकांना कोणताही धक्का न पोहोचवता आपण हे ऑपरेशन यशस्वी करून दाखवले. पाकिस्तानने आपण हे युद्ध हरल्याची अधिकृत घोषणा केली नसली, तरी मानसिकदृष्ट्या हा देश हरल्याचे स्पष्ट दिसत आहे. तेथील राजकारणी, पंतप्रधान, सेनाध्यक्ष, फिल्ड मार्शल, सैन्य या सगळ्यांनाच आपण जिंकलो नसून हरल्याची भावना सतावत आहे. तसे पाहिले तर कोणताच देश आपण युद्ध हरलो, असे कबूल करत नाही. परंतु, पाकिस्तानातील सध्याचे वातावरण आणि तेथील लोकांची वक्तव्ये पराभव मान्य केल्याचे सूचित करणारी आहेत.

आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे मागील काही दिवसांमध्ये बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानविरोधी मोहीम तीव्र झाली आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ने घोषणा करत सुराब या शहरावर पूर्ण नियंत्रण मिळविल्याचे स्पष्ट केले आहे. आता हे शहर आपल्या ताब्यात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ही बाबदेखील नोंद घेण्याजोगी ठरेल. म्हणजेच एकीकडे पाकिस्तानच्या अडचणी वाढणे तर दुसरीकडे भारताप्रतीचा विश्वास बलाढ्य होऊन आपल्या रॉकेट प्रणाली वा संरक्षक शस्त्रांना जगभरातून मागणी वाढणे हे भारताची ताकद वाढत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल. हे वास्तव भारताची जबाबदार भूमिका स्पष्ट करण्यास पुरेसे म्हणावे लागेल. 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच राहण्याचा परिणाम येत्या काळातही नक्कीच बघायला मिळेल. भारताच्या या कठोर पावलामुळे दहशतवादी कारवाया कमी होण्यास मदत होणार आहे. या जोरदार तडाख्यामुळे दहशतवादी गट मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या हरले आहेत. त्यांची ताकद कमी झाली आहे. म्हणूनच भारताविरुद्ध कोणतीही दहशतवादी कारवाई करण्यापूर्वी त्यांना आता दहा वेळा विचार करावा लागेल. खेरीज काश्मीरमध्ये पर्यटकांनी येण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री आवाहन करताना दिसत आहेत. पर्यटकांनी आनंदाने यावे, काश्मीर त्यांचे रक्षण करण्यास समर्थ असल्याचे त्यांचे प्रतिपादन पर्यटकांमध्ये विश्वास निर्माण करत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील राजकारण्यांची ताजी भूमिकाही चर्चेचा विषय ठरत आहे. पहलगाममध्ये हल्ला झालेल्या ठिकाणी मृत पर्यटकांचे स्मारक उभारण्याचे जाहीर करून श्रद्धांजली वाहण्याचा निर्णयही महत्त्वपूर्ण म्हणावा लागेल. यातून सरकार जागरूक आणि संवेदनशील असल्याचा संदेश समाजापर्यंत जाईल. स्वाभाविकच याची दखल घेतली जाईल. आता सरकारबरोबरच नागरिकांचीही जबाबदारी वाढली आहे. कोणीही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये; केवळ भारताच्या भूमिकेवर विश्वास ठेवायला हवा. या सगळ्यामध्ये पाकिस्तानला मदत करणाऱ्या, त्यांच्या कृतीचे समर्थन करणाऱ्या तुर्की वा अजरबैजान या देशांविरुद्ध भारताने ठाम भूमिका घेतली आहे. आपण त्यांच्यावर विश्वास ठेवणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांच्या भूमिकेचा जाहीर निषेधही भारताने नोंदवला आहे. तुर्कीने पाकिस्तानला मदत केल्याचे परिणाम लवकरच भोगावे लागणार असून व्यापार, व्यवसाय, नागरिकांचे येणे-जाणे या सगळ्यांवरील निर्बंधाच्या रूपाने ते पाहायला मिळतील. तुर्कीमधील काही कंपन्या भारतात काम करतात. आता भारत त्या बंद करत असल्यामुळे त्यांना मोठे नुकसान सोसावे लागणार आहे. खेरीज रशिया आणि पाकिस्तानमध्ये तंत्रज्ञान देण्याविषयक करार झाला असला, तरी हा देश त्यांना शस्त्र विकणार नाही. रशियाला पाकिस्तानपेक्षा भारताची जास्त गरज आहे. हे सगळे लक्षात घेता भारताची दहशतवादाविरुद्धची लढाई योग्य दिशेने सुरू असून त्याला जगाचा पाठिंबा असल्याचे लक्षात घ्यायला हवे.


(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

संजय रामगिरवार

# रस्ते, 'फूटपाथ'चे अतिक्रमण घातकच!

चंद्रपुरातील तुकूम भागात हायवा ट्रकने सानिका कुमरे या २२ वर्षीय तरुणीला जागीच चिरडले. लक्कडकोटच्या एका शेतकऱ्याची ही पोर पोलिस अधिकारी व्हायचे स्वप्न उराशी बाळगून चंद्रपुरात आली होती. सोमवारी सायंकाळी अभ्यासिकेतून परत आपल्या निवासस्थानी जाताना हा अपघात घडला. खरे तर, याला अपघात म्हणूच नये. कारण अपघात आकस्मिक, अनपेक्षित असतो. जेथे अर्धाअधिक रस्ताच दुकानांच्या आणि वाहनांच्या अतिक्रमणामुळे रोखून धरला असेल आणि अगदी सहजपणे अपघात घडावा अशीच स्थिती जाणूनबुजून तयार केली गेली असेल, तर त्याला अपघात तरी कसा म्हणायचा? या घटनेतही असेच झाले. ट्रकचालकाचे नियंत्रण सुटले आणि समोर अतिक्रमणामुळे केवळ काही फुटाच्या रस्त्यावर चालणाऱ्या पादचारी व दुचाकीस्वारांना चिरडण्यापलीकडे आणखी दुसरे काही घडणार होते? अन्य एक मुलगी व महिलाही जखमी झाली. समोरच्या आणखी काही लोकांचे सुदैव की, या तिघांना धडक दिल्यानंतर तो ट्रक रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडाला धडकून बंद पडला. अन्यथा त्या साऱ्यांचे मरण होतेच. ही घटना व्यापकदृष्टीने एक शहरातील लहानशी वाटत असली तरी समस्या म्हणून ती सार्वत्रिक आहे. चंद्रपूर असो, की मग विदर्भातील अकोला, यवतमाळ, वर्धा, अमरावती किंवा अन्य लहान शहरे असोत, सगळीकडे रस्ते व 'फूटपाथ'वरचे अतिक्रमण थोड्याफार फरकाने सारखेच आहे. अनेक शहरांत पदपथ नावालाच आहे. कारण त्यावर समोरच्या दुकांनाचे साहित्य ठेवले असते. इतके की तेथून चालणे शक्य होत नाही. दुकानदारांच्या दादागिरीमुळे नाईलाजाने पायी चालणाऱ्यांना त्यांचा हक्काचा मार्ग सोडून मुख्य मार्गावर चालावे लागते. तेथेही दुचाकी व चारचाकी ठेवल्या असतात आणि त्यामुळे अर्धाअधिक रस्ता नसतोच, उर्वरित काही फुटाच्या रस्त्यावरून, मोठ्या वर्दळीतून जीव मुठीत घेऊन लोकांना जावे लागते. मागून येणारे वाहन कधी धडक देईल याचा काहीच नेम नसतो. याही घटनेत असेच झाले, जे अतिशय लज्जास्पद आणि कानात मुंग्यांचे वारूळ निर्माण करणारे आहे. अतिक्रणधारकांची मुजोरी, ती काढण्याची जबाबदारी असलेल्या मनपा अधिकाऱ्यांची नालायकी आणि दुचाकी चालकांकडून चालान कापण्याचीच आपली जबादारी आहे किंवा त्यालाही बगल देत वरचे चार दोन पैसे खिशात कोंबणे एवढेच आपले कर्तव्य आहे, अर्धा रस्ता घेरून उभे असलेले ऑटो, चारचाक्या घटवणे हे काही आपले काम नाही म्हणून काखा वर करणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या अकार्यक्षमतेचा हा परिपाक आहे. आपल्या व परिवाराच्या चांगल्या आयुष्याचे स्वप्न रंगवणाऱ्या आणि त्यासाठी गाव सोडून शहरात अभ्यास करणाऱ्या या तरुणीचा कसलाही दोष नसताना बळी गेला. त्या कुटुंबाचा गहिवर, त्यांचे डोंगराएवढे दु:ख हे सारे सरकारी अधिकारी समजू शकणार आहेत का? एवढी असंवेदनशील व ढिम्म झालेली ही व्यवस्था मोठी घातक आहे, बघा.



नागपूरचा थोडाफार अपवाद वगळता अख्ख्या विदर्भाच्या साऱ्याच शहरांमध्ये वाहनतळ नावालाही नाही. वाहनतळ उपलब्ध नाही म्हणून चारचाकी आणि दुचाकीवाले भर रस्त्यांवर त्यांच्या गाड्या उभ्या करून निघून जातात. रस्ते तुंबतात, भांडणं होतात आणि रस्त्याच्या कडेला चहा पीत वाहतूक पोलिस खिदळत असतात, हे चित्र कुण्या एका शहराचे नाही, तर सर्वव्यापी आहे. ऑटोवाल्यांची तर कमाल आहे. भरधाव वेगाने रस्त्यावर जात असलेला ऑटो अचानकपणे ग्राहक गावला म्हणून करकच्चपणे अचानक थांबतो. धडक न देण्याची कसरत मागच्या वाहनधारकाने त्याची त्याने करावी, असा काहीसा या ऑटोचालकाचा अविर्भाव असतो. कुणी जरा त्याला काही बोलले तर तो शिवीगाळ करायला, प्रसंगी थोबाडीतही मारायला मागेपुढे पाहात नाही. कारण त्याचे सहकारी ऑटोचालक त्याचाच पक्ष घेणार हे त्याला माहीत असते. अशी संघटित गुन्हेगारी आपणच काय, वाहतूक पोलिसही उघड्या डोळ्यांनी बघत असतात. ऑटोचालकांवर कारवाई का करीत नाही असे विचारले तर, जाऊ द्या न बिचारे गरीब आहेत, अशी अजब दिलदारी हे वाहतूक पोलिस दाखवतात. जणू गरीब असणे हा वाहतुकीचे नियम मोडण्याचा परवाना आहे..! येथे विशेष उल्लेखनीय असे, रात्री दहा वाजेपर्यंत चंद्रपूरच्या तुकूम परिसरातील या रस्त्यावर मोठी वाहने जाऊ नये असा नियम केला असताना, हा ट्रक सायंकाळी ५ वाजता तेथे काय करीत होता? या प्रश्नाचे उत्तर आता कोण देणार आहे..!

९८८१७१७८३२

## धर्म-संस्कृती

# 'शमी शमयते पापम्...!'

प्रा. दिलीप जोशी

हिंदू संस्कृती अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालणारी असून, प्रत्येक गोष्ट आपल्या ऋषिमुनींनी संशोधन करून तिची उपयुक्तता सिद्ध केलेली आहे. चराचर सृष्टीबाबत तर भारतीय तत्त्वचिंतनाला जगात तोड नाही. व्यष्टी ते परमेष्ठी प्रवासात सृष्टीला महत्त्वाचे स्थान आहे. सृष्टीतील सर्वच वनस्पतींना आयुर्वेदात स्थान आहे. 'आयुर्वेद' हा वेदाचा उपवेद आहे. त्यामुळे बहुतेक वनस्पती अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड आहेत. जसे तुळशीपत्र आणि भगवान विष्णू, बिल्वपत्र आणि भगवान शिव, दूर्वा आणि भगवान गणेश अशा वनस्पती त्या त्या देवतांना प्रिय आहेत. यातील प्रत्येकाला औषधी आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. याच वनस्पतीमध्ये अत्यंत गुणकारी आणि आध्यात्मिक वनस्पती म्हणजे 'शमीदलपत्र' होय. वेद, उपनिषद, रामायण, महाभारत, महाकवी कालिदास वाङ्मय अशा सर्वच प्रमुख ग्रंथांमध्ये शमीचा उल्लेख आहे. शमी वनस्पतीच्या उत्पत्तीची पौराणिक कथा देवर्षी नारदांनी देवेंद्राला सांगितली आहे.

औरव नावाच्या ऋषींना शमिका नावाची मुलगी होती. तिचा विवाह धौम्यऋषींचा पुत्र मंदार याच्याशी झाला. मंदार हा ऋषी शौनक यांचा शिष्य होता. लग्नानंतर मंदार आणि शमी आपले गुरू ऋषी शौनकाच्या दर्शनासाठी निघाले असताना वाटेत त्यांना ऋषी भृशुंडी यांचा आश्रम दिसला. त्यांचे दर्शन घेण्यासाठी हे नवविवाहित शमी-मंदार भृशुंडी ऋषींच्या आश्रमात गेले. ऋषी भृशुंडी हे पराकोटीचे गणेशभक्त होते. त्यामुळे त्यांचे स्वरूप 'प्रतिगणेशरूप' म्हणजे त्यांना गजमुख होते. त्यांचे ते सोंड असलेले स्वरूप पाहून शमी आणि मंदार यांना हसू आले. हे पाहून ऋषी भृशुंडी संतप्त होऊन त्यांनी त्यांना अस्पर्शी वनस्पती होण्याचा शाप दिला. त्या प्रभावाने शमी ही काटेरी वनस्पती बनली आणि मंदार म्हणजे रुईचे झाड बनले. आपल्या मुलीची आणि जावयाची ही अवस्था पाहून ऋषी औरव यांनी भगवान गणपतीची साधना केली. भगवान गणेश प्रसन्न झाले, पण आपल्या शिष्याने दिलेला शाप मला मागे घेता येणार नाही, पण शमी आणि मंदार हे चिरकाल स्मरणात राहावेत म्हणून मी त्यांना वरदान देतो की, या दोन्ही वनस्पती मला प्रिय असतील. तेव्हापासून या दोन्ही वनस्पतींना दैवीक स्थान आहे. त्यातही शमीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**'शमी शमयते पापम्, शमी लोहित कंटका ।**
**धारिण्यर्जुन बाणानाम्, रामस्य प्रिय वादिनी ॥'**

शमी पापाचे शमन करतो. शमीच्या फांदीवर असणारे रक्तकंटक म्हणजे तांबुस काटे सतत सजग ठेवतात. ज्या शमीने अर्जुनाचे गांडीव धारण केले तोच शमी वृक्ष रामाची स्तुती करतो आणि राम त्याची पूजा करतात. रक्षंतिस्म परस्परम् असे ते आहेत. शमीचे हिंदू संस्कृतीत आध्यात्मिक, पौराणिक, आयुर्वेदीय, यज्ञिय, वास्तुशास्त्रीय आणि कृषिशास्त्रीय उपयोग आहेत. आपल्या संस्कृतीत 'सीमान्ते शमिपूजन' आहे. युद्धावर जाताना आणि येताना सीमेवर शमिपूजन होत असे. भगवान रामचंद्रांनी रावणवधापूर्वी शमिपूजन केल्याचे पुराणात वर्णन आहे. पांडवांच्या अज्ञातवासात त्यांनी आपली सर्व शस्त्रे शमी वृक्षाच्या ढोलीत ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर त्यांनी यथासांग शमिपूजन केले होते. दसऱ्याच्या दिवशी म्हणूनच सीमोल्लंघन करताना सीमेवर शमिपूजन केले जाते.

भृगू ऋषी क्रोधित झाले तेव्हा जातवेद नावाचे अग्निदेव शमिवृक्षात लपून बसले. तेव्हापासून शमिवृक्षात अग्नी निवास आहे. त्यामुळेच यज्ञादी कर्म करताना अरणी मंथनातून अग्नी उत्पन्न करतात. त्यासाठी असणारी अरणी शमीच्या खोडापासून बनलेली असते. अरणी मंथन होते आणि त्यातून उत्पन्न होणारा अग्नी म्हणजे जातवेद अग्नी; त्यालाच यज्ञाग्नी म्हणतात. त्या अरणी मंथनातून निर्माण यज्ञाग्नीने यज्ञकुंड प्रज्वलित करतात. महाकवी कालिदासांनी याच वृक्षाखाली यमद्वितीयेला तप:साधना केल्यामुळे त्यांची पंडाबुद्धी जागृत झाली होती. म्हणजे अर्जुनाचे क्षात्रतेज आणि महाकवी कालिदासांना प्राज्ञतेज अर्थात शस्त्र आणि शास्त्रावर प्रभाव असणारी ही वनस्पती आहे.

शमिपर्ण हे दलपत्र आहे. म्हणजे पानावर अनेक पर्णिका असतात. पर्णिकाच्या अग्रस्थानी लोकपालादी संरक्षक देवता असतात. मध्यभागी अपराजिता त्रिगुणात्मिका जगदंबा तर मुळाशी भगवान महादेव तथा शनिसह नवग्रह निवासी असतात. शमीमुळे जमिनीतील नत्र वाढून उपजाऊ क्षमता वाढते. ज्याला प्राचीन कृषिशास्त्रात मरुस्थळीकरण म्हणतात; म्हणजे शेती अनुत्पादक होण्याची क्रिया रोखली जाते. शमीचा उल्लेख ऋग्वेदातही आहे.

**'विष्ट्वी शमी तरणीत्वेन वाघतो ॥'**

ऋग्वेदानुसार शमी अतिशीघ्रतेने अमृत तत्त्वाला म्हणजे मोक्षाचा मार्ग प्रशस्त करतो. आयुर्वेदानेही शमीची औषधी उपयुक्तता सांगितली आहे. कफनाशक, कुष्ठरोधक, खाजेवर, अस्थमा, दातरोग, रक्तशर्करा, प्रसववेदनानाशक आणि विंचू चावला तर त्यावर उपयोगी वनस्पती म्हणून उल्लेख आहे. शमी कठोर जलतत्त्व, वायुतत्त्व आणि भूतत्त्व असलेल्या ठिकाणी उगवते म्हणजे वाळवंटी प्रदेशातही शमी बहरते. वराहमिहिर यांनी, जेव्हा शमी बहरते त्यावर्षी पाऊस कमी पडत असल्याचे म्हटले. यज्ञात ज्या विविध समिधा वापरतात त्यात शमीचाही समावेश आहे. शमी सकारात्मक स्पंदने प्रवाहित करतो. शमी वायू शुद्धीकरण म्हणजे प्रदूषण टाळण्यास मदत करते. काटेरी असल्यामुळे गैरसमजापोटी काही जण शमीला घराजवळ लावण्यास निषिद्ध मानतात, पण शमी घराजवळ असल्यास सकारात्मकता, लक्ष्मीवर्धन आणि विवेकवृत्ती जागरण होते.

**'त्वत्प्रियाणि सुपुष्पाणि कोमलानि शुभानि वै ।**
**शमी दलानि हेरम्ब गृहाण गणनायक ॥'**

या मंत्राने सामान्यजनांनी शमिदलपत्र आर्तभावाने जसे हातात येईल तसे गणपतीच्या मस्तकावर वाहावे. साधकांनी हे शमीचे पान सरळ वाहावे तर तंत्रसाधकांनी श्रीगणेशाच्या मस्तकावर उपडे वाहावे. शमिवृक्ष आयर्वेदीय असल्यामुळे आरोग्यवर्धक आहे. नायट्रोजन निर्मितीमुळे जमिनीची उपजाऊ क्षमता असणारा शेतकऱ्यांचा मित्र, आध्यात्मिक साधकांना सकारात्मक ऊर्जा देतो म्हणून तो पूजनीय, घराच्या अवतीभोवती असल्यास ज्ञान आणि लक्ष्मीला पूरक म्हणून वास्तूला पूरक, जातवेद अग्नीमुळे शस्त्र आणि शास्त्रपूरक आहे. त्यामुळेच तो पापनाशक आहे. खरं सांगू ! कोणताच माणूस आणि कोणतीच वनस्पती बिनाकामाची नसते. फक्त त्याचे योग्य उपयोजन माहीत हवे. शमी वृक्ष तर आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक आहे. म्हणूनच त्याचे महत्त्व शमिसूक्तात आहे.

**'शमी शमयते रोगान्, शमी शमयते रिपून् ।**
**शमी शमयते पापम्, शमी सर्वार्थसाधिनी ॥'**

९८२२२६२७३५

### ईपीएस-९५ संबंधी दिशाभूल करणाऱ्या पोस्ट

ईपीएस- ९५ योजनेअंतर्गत मिळणाऱ्या १००० रुपये पेन्शनमध्ये वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. आता त्या योजनेअंतर्गत ज्यांना १००० रुपये आणि त्यापेक्षा कमी दरमहा पेन्शन मिळत आहे त्यांना मार्च २०२५ पासून दरमहा ७५०० आणि त्यावर आधारित महागाई भत्ता मिळेल अशा आशयाची पोस्ट समाज माध्यमावर सतत येत आहे. ही माहिती दिशाभूल करणारी, भ्रमित करणारी आहे. असा निर्णय केंद्र सरकारने अद्याप घेतलेला नाही.

हरयाणा सरकारने त्यांच्या निवृत्तिवेतनधारकांसाठी निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत ईपीएस-९५ अंतर्गत ज्यांना १००० रुपये पेन्शन मिळत आहे त्यांना राज्य सरकार २००० रुपये आपल्या निधीतून देणार असल्याची माहिती आहे. अशाप्रकारे त्या राज्यातील निवृत्तिधारकांना दरमहा किमान पेन्शन ३००० रुपये मिळेल. हा निर्णय निश्चितच अभिनंदनीय आहे तसेच अनुकरणीय देखील आहे. अन्य राज्य सरकारांनी असाच या योजनेला हातभार लावला तर काही प्रमाणात का होईना संबंधित निवृत्तिधारकांना दिलासा मिळेल. त्यांचे उर्वरित आयुष्य सुखमय, आनंदमय होऊ शकेल. महाराष्ट्र एक विकसित राज्य आहे. केंद्र सरकारच्या योजनेला हातभार लावण्याचे काम राज्य सरकार करीत असते. त्याच दृष्टिकोनातून या योजनेकडे बघितले तर शोषित, पीडित निवृत्तिवेतनधारक राज्य सरकारला आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाहीत.

**वसंत पिंपळापुरे**/९४२२८०७०१३

### वृक्षलागवड त्रासदायक ठरू नये

पावसाळा सुरू होताच अनेक संघटना, संस्था आणि शासनाद्वारे मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जाते. शहरात व ग्रामीण भागात तर ठिकठिकाणी वृक्षलागवड करण्यात येते. परंतु अनेक वृक्ष विद्युत तारांखाली लावले जातात. यामुळे जीवितहानी व अनेकदा विजेच्या



## वाचक पत्रे

संकटाचा त्रास सहन करावा लागतो. मोठे वृक्ष, वड, पिंपळ, कडुलिंब व इतरही झाडे घरासमोर किंवा लहान प्लॉट, फ्लॅटमध्ये लावले जातात. त्यामुळे स्वत:सोबतच दुसऱ्याच्या घराचे आपण नुकसान करीत असतो. तेव्हा वृक्षलागवड करताना भविष्यात आपल्याला व इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या.

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

### जलसाठ्यातील जलपातळी रोखण्याचे आव्हान

राज्यातील भूगर्भातील जलपातळी सतत घटत आहे, तर दुसरीकडे पावसाचे पाणी साठवून जे जलसाठे तयार होतात ते याच वाढत्या तापमानामुळे अत्यंत वेगाने घटतात. म्हणजे अगदी डिसेंबरमध्ये अनेक धरणांची पातळी ही अध्यपिक्षाही खाली गेलेली असते आणि मे महिन्यामध्ये तर अनेक धरणे ही कोरडी झालेली पाहायला मिळतात. केवळ बाष्पीभवनातून पाण्याचा साठा वेगाने घटत असतो. ज्यातून दोन्ही पद्धतीने पाणी शोषले जाते किंवा जमिनीखालची पातळी अधिकाधिक काळ अशी टिकून राहील याबद्दलच्या नवनवीन उपाययोजना राबवल्या गेल्या पाहिजे. तरच पाणीटंचाईचा काही प्रमाणात मात करता येणे शक्य होऊ शकेल. पण दुर्दैवाने सरकारकडून तसे प्रयत्न होताना दिसत नाही.

जलसाठ्यातील जलपातळी रोखण्यासंदर्भातल्या काही उपाययोजनांमध्ये काही बाबींचा अंतर्भाव करता येऊ शकतो. जसे वाढत्या तापमानाचे एकाअर्थी तोटेच आहेत. कारण त्यातून केवळ पाणी नाहीसे होण्याचा प्रकार घडतो. अशावेळी अगदी उन्हाळ्यामध्ये हे जलसाठे आच्छादित कसे करता येतील आणि उष्णतेमुळे त्यांचे बाष्पीभवन कसे रोखता येईल याचे प्रयोग करता येऊ शकतात. तर जलयुक्तशिवाराबरोबर अधिकाधिक छोटे छोटे जलसाठे टिकवण्यासाठी पावसाळ्यात जलपुनर्भरण योजना राबवता येऊ शकतात. आज स्वच्छतेसाठी ग्रामपंचायतींना पाच लाख रुपये तर महानगरपालिकांना दोन ते तीन कोटींची बक्षिसे दिली जातात. शहरे आणि गावांची स्वच्छता सर्वेक्षण होतात. त्याच पद्धतीने जलस्तर रोखण्याचे सर्वेक्षण आणि स्पर्धा घेण्याची आवश्यकता आहे. जे गाव किंवा महानगर पाणी साठवण्याबाबत लोकसहभागातून किंवा आपल्या कौशल्याने जर काही योजना राबवत असेल आणि त्या परिसरातील एकूणच भूगर्भातील जलपातळी कायम ठेवण्यात यशस्वी होत असेल तर अशा गावांना किंवा महानगरांना बक्षिसे दिली गेली पाहिजेत.

यासाठी पावसाळ्यातले पाणी टिकवणे ते पाणी इकडे तिकडे वाहून न जाता त्याचे त्या त्या गावाच्या किंवा महानगराच्या पंचक्रोशीत पुनर्भरण करणे किंवा उन्हाळ्यामध्ये आपापल्या गावातील, महानगरातील जलसाठ्याचे बाष्पीभवनातून होणारे नुकसान न होऊ देणे हे उपाय करता येऊ शकतात.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महावितरणच्या चित्रकला स्पर्धेत अनेकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ जून -**
महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त बालकांनाही वीज सुरक्षेचे धडे रंगवता या उद्देशाने आयोजीत चित्रकला स्पर्धेत महावितरण मधील अधिकारी, कर्मचारी यांच्या पाल्यांनी उत्सफुर्त सहभाग नोंदवला. विजेत्या स्पर्धकांना प्रभारी मुख्य अभियंता प्रशांत दाणी यांच्या हस्ते बक्षीसांचे वाटप करण्यात आले.

राज्यभरात १ ते ६ जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे. सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी मंगळवारी (०३ जून) लातूर विभागामध्ये प्रशिक्षण केंद्र येथे १५ मुलांनी तर निलंगा विभागांतर्गत निलंगा येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयात संपन्न झालेल्या चित्रकला स्पर्धेत ४० पाल्यांनी चित्रकलेच्या माध्यमातून वीज सुरक्षे बाबत विविध आशयाची चित्रे रेखाटली. लातूर येथील स्पर्धेत प्रथम क्रमांक उर्वी प्रशांत हुडे हीने पटकावला तर अदीती गोकूळ कांबळे हीने दुसरा क्रमांक पटकावला तर तिसरा क्रमांक अलिजा फातिमा तय्यब मुल्ला व श्रेयश विकास बाळापूरे या दोघांना विभागून देण्यात आला.

लातूर विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता शैलेश पाटील, उपव्यवस्थापक अजीत जैन,मंजूषा पाठक, मारुती कांबळे यांनी परिश्रम घेतले तर निलंगा विभागाचे कार्यकारी अभियंता नागेश देशमूख, उपकार्यकारी अभियंता शिवशंकर सावळे, उपव्यवस्थापक संजय पाटील, कनिष्ठ अभियंता शरद खाडे यांनी परिश्रम घेतले.

५ जुनला वसुंधरा दिनी सर्वच सात विभागीय स्तरावर वीज सुरक्षा व बचत विषयी रॅली काढण्यात येणार असून वृषारोपन ही केले जाणार आहे. तर ६ जून रोजी सकाळी परिमंडलातील सर्व शाखा कार्यालयातील जनमित्र वीज सुरक्षेबाबत प्रतिज्ञा घेणार आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## बाभळगाव येथे संयुक्त सेवापूर्ती सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचालित विविध विद्याशाखेतील नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत असलेले मुख्याध्यापक,पर्यवेक्षक, प्राध्यापक यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले. यामध्ये संस्थेअंतर्गत चालणाऱ्या माणिकप्रभु माध्य व उच्च माध्य विद्यालय, जेवळीचे मुख्याध्यापक श्री. नंदकुमार बारबोले, पोलीस वेल्फेअर हायस्कूल पोलीस वसाहत बाभळगावचे मुख्याध्यापक श्री कुमार काकडे, कै.व्यंकटराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, बाभळगावचे प्रा.सुरेश बिरादार यांचासंस्थेच्या वतीने सेवा निवृत्ती निमित्ताने संयुक्त सेवापूर्ती समारंभ संपन्न झाला.
समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष नरसिंह देशमुख होते. तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव शामराव देशमुख हे उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त लातूर येथील मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयाने आणि विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढी मार्फत लातूर येथील १३२ के.व्ही. कोयना उपकेंद्र येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ६७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.
छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता नसीर कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. अधीक्षक अभियंता दत्ता जाधवर, प्रकाश जायफळ, राहुल जोशी, प्रशांत कानडे, अशोक गडदे यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. तसेच अतिरिक्त कार्यकारी अभियंता सचिन भणगे, सुजित भोकरे, भागवत मुसळे आणि दिनेश पुरी यांनीही शिबिराच्या यशस्वितेसाठी योगदान दिले. लातूर महापारेषण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या सामाजिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत शिबिर यशस्वी केले.

## लिपिकाच्या मृत्यूस कारणीभूत शिक्षकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
देवणी तालुक्यातील टाकळी येथील राष्ट्रीय विद्यालयाच्याच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या शाळेचा शिक्षक तथा संस्थेच्या सचिवावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
शाळेचे लिपीक बसवेश्वर स्वामी यांनी आत्महत्या केली होती. या प्रकरणी मयताची पत्नी लता स्वामी (रा. साकोळ) यांच्या जबाबावरून देवणी पोलिसांनी शिक्षक तथा संस्थेचे सचिव निहाल जाफरसाब सौदागर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील टाकळी येथील लिपीक बसवेश्वर काशीनाथ स्वामी (वय ५२) यांनी जवळगा येथील मांजरा नदीत उडी मारून आत्महत्या केली होती. ते गेल्या ३० वर्षांपासून शाळेत लिपिक पदावर कार्यरत होते. याप्रकरणी दत्ता स्वामी यांनी फिर्याद दिली आहे.

## टेम्पोची कंटेनरला धडक; एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
उदगीर-लातूर मार्गावरील नरसिंगवाडी पाटीजवळ (ता. उदगीर) पोकलेन घेऊन थांबलेल्या कंटेनरला आयशर टेम्पोची धडक बसली. या अपघातात टेम्पोतील एकाचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.
सोलापूरहून उदगीरकडे शेंगदाणा भरुन येणारा आयशर टेम्पो नरसिंगवाडी पाटीजवळ येताच पोकलेन घेऊन थांबलेल्या कंटेनरला जोराची धडक बसली. या अपघातात टेम्पोत बसलेले निंगप्पा पाटील यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना उदगीर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात रात्री उशिरा आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# माहेश्वरी पतसंस्थेत ८ कोटी १८ लाखांचा अपहार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
येथील माहेश्वरी सहकारी पतसंस्थेत ८ कोटी १८ लाख रुपयांचा अपहार झाल्याची फिर्याद पतसंस्था कर्मचाऱ्यांविरोधात देणारे पतसंस्था अध्यक्ष व सचिवांवरच लेखा परीक्षण अहवालात ठपका ठेवण्यात आला आहे.

यामुळे पोलिसांनी कलमात वाढ केली आहे. परंतु, त्या अपहारात अध्यक्ष-सचिवांसह संचालकही आरोपी आहेत, त्यांच्यावरही गुन्हा दाखल व्हावा, फिर्यादीच आरोपी झाल्याने ठेवीदारांना फिर्यादी करण्याच्या मागणीचे निवेदन ठेवीदारांच्यावतीने गांधी चौक पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षकांना देण्यात आले आहे.

२००८-०९ मध्ये स्थापन झालेल्या माहेश्वरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष सचिवांनी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ठेवीदारांचा विश्वासघात करीत पतसंस्थेतील ठेवी स्वत:साठी वापरल्या.

यामुळे सुमारे अडीचशे ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. अनेक सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली आयुष्याची पुंजी या पतसंस्थेकडे ठेव म्हणून ठेवली आहे.

परंतु, पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीच ८ कोटी १८ लाख १८ हजार ९७० रुपांचा अपहार केला. सुरुवातीला हा भ्रष्टाचार झाल्याचे पतसंस्थेच्या अध्यक्ष सचिवांनीच कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार देऊन उघड केले होते. परंतु, सहकार उपनिबंधक विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या विशेष लेखा परीक्षण अहवालात अध्यक्ष-सचिवही यात दोषी असल्याचे म्हणणे मांडले आहे. यामुळे फिर्यादी असलेल्या फुलचंद (राजू) पल्लोड यांच्यासह सचिव प्रेमकिशोर मुंदडा यांच्याविरोधात पोलिसांनी कलमे वाढविली आहेत. या प्रकरणात पल्लोड यांच्या फिर्यादीवरून पूर्वी शाखाधिकारी भीमाशंकर पाटील, रोखपाल सोमनाथ पंडित यांच्याविरोधात गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील सोमनाथ पंडित याला अटकही करण्यात आली आहे.

पल्लोड यांच्या तक्रारीनंतर गांधी चौक पोलिसांनी सदर अर्ज सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालयाकडे पाठविला होता. तेथे सहायक निबंधक कार्यालयाचे वर्ग-२ अधिकारी डी. टी. गायकवाड यांनी तब्बल नऊ महिन्यांचा कालावधी घेऊन लेखापरीक्षण केले. त्यात अध्यक्ष व सचिवही दोषी असल्याचा ठपका ठेवला आहे. यामुळे त्यांचाही आरोपीमध्ये समावेश करीत कलमांमध्ये वाढ केली आहे. या अपहार प्रकरणात अध्यक्ष-सचिवांसह संचालक मंडळही दोषी आहे. त्यांच्यावरही गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी, ठेवीदारांच्या ठेवी परत कराव्यात, अशी मागणी ठेवीदारांच्यावतीने गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याविषयी गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांना विचारणा केली असता सदर प्रकरणात लेखापरीक्षण अहवालानुसार कलमांमध्ये वाढ करण्यात आली आहे. परंतु, पैशाचे प्रकरण असल्यामुळे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी ते आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केले असल्याचे सांगितले.

## माजी आ.देशमुखांनी यांनी केली सभागृह कामाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
माजी आमदार धिरज देशमुख यांनी रेणापूर येथील ग्रामदैवत श्री रेणुकादेवी मंदिरात जाऊन मातेचे दर्शन घेऊन मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांशी मंदिराच्या पायाभूत सुविधांसंदर्भात संवाद साधला.

रेणापूरकरांच्या मागणीची दखल घेऊन महाविकास आघाडी सरकारच्या काळात सातत्याने पाठपुरावा केल्याने मंदिराच्या पायाभूत सुविधांसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून ५० लाख रुपयांचा निधी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी उपलब्ध करून दिला होता. या निधीतून मंदीर दर्शन रांग आणि दुसऱ्या मजल्यावरील सभागृहाचे बांधकाम झाले आहे. याची पाहणी त्यांनी यावेळी केली.

मंदिराच्या गेटचे व अन्य वाढीव बांधकाम पूर्ण करण्यासाठी फेर प्रस्ताव सादर करण्याबाबत यावेळी मंदिर समितीला त्यांनी सूचित केले. या कामासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून मंदिराच्या पायाभूत सुविधा व मंदिर परिसर अधिक चांगला होईल, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असा शब्द त्यांनी यावेळी दिला.

याप्रसंगी अनंतराव ठाकूर-देशमुख, व्हा. चेअरमन प्रविण पाटील, रेणापूर शहर काँग्रेस अध्यक्ष पदम पाटील,जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषेराव हाके-पाटील, मंदीर समितीचे राम पाटील, रमाकांत वाघमारे, शहाजी कातळे, नाना व्यवहारे, प्रशांत आकनगिरे आदी उपस्थित होते.

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
महाराष्ट्राचे लोकनेते, माजी केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत गोपिनाथरावजी मुंडे यांच्या स्मृतीदिना निमित्त अहमदपूर शहरातील गोपीनाथराव मुंडे चौक येथे नामफलकाला पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी राज्याचे माजी मंत्री विनायकराव पाटील,जेष्ठ नेते गणेशदादा हाक्के पाटील, माजी नगरसेवक सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, रूध्दा गावचे सरपंच नाथराव केंद्रे,माजी नगरसेवक संतोषभाऊ शेप,माजी पंचायत समिती सदस्य यतीराज केंद्रे, शिवसेना माजी तालुकाप्रमुख गोपीनाथराव जायभाये, रामानंद, वंजारी सेवासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशराव मुंडे, पत्रकार अजय भालेराव, सरपंच बाळू मूंडे, पवन कराड, इप्पर मामा,इर्शाद भाई, गंगाधर सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

## जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यांना तात्काळ अटक करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई डिजिटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थभैय्या भोकरे यांना अज्ञात इसमाने पत्राद्वारे जीवे मारण्याचे धमकी दिली आहे. धमकी देणाऱ्यांना पोलीस प्रशासनाने तात्काळ अटक करावी अन्यथा राज्यभर पत्रकार संघाच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल, असे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे यांनी मुख्यमंत्री यांना दुपारी एक वाजता जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पाठवलेल्या निवेदनात इशारा दिला आहे.

सिंदूर ऑपरेशन यशस्वीतेनंतर बॉलीवूड अभिनेते खान बंधू यांनी पाकिस्तानचा निषेध करायला हवा होता. पाकिस्तान मधील अभिनेत्यांनी त्यांच्या देशाचा अभिमान असल्याचे दाखविले तसा आपल्या बॉलिवूडमधील अभिनेते खान बंधू यांनी भारता बाबत अभिमान दाखवायला हवा होता, असे परखड मत दि. १५ मे २०२५ रोजी प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे यांनी केले होते.

त्याबाबत अज्ञात इसमाने खान बंधूची तू माफी माग नाही तर तुला उडून देऊ असे धमकीचे पत्र पाठवले आहे. हे धमकीचे पत्र पाठवण्याऱ्या माथेफिरूला लवकरात लवकर अटक करून कडक कारवाई करावी अन्यथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई राज्यभरात लोकशाही पद्धतीने आंदोलन करेल, असा इशारा राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे यांनी दिला आहे.

सिद्धार्थ भोकरे हे डिजिटल मीडियाच्या पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. परवाच त्यांचे लातूर व नांदेड येथे मोठमोठे कार्यक्रम झाले आहेत.

उर्वरित जिल्ह्यातील दौरे यशस्वी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने त्यांना संरक्षण द्यावे, असे या निवेदनात म्हटले आहे.

सदर निवेदनावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, शहर अध्यक्ष महादेव डोंबे,डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष मनीष हजारे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, कार्याध्यक्ष कारभारी, हरुण मोमीन, आनंद दणके, मारुती पवार, सुशील शिंदे,शरद राठोड,अरुण कांबळे, अमोल शिंदे, श्रीकांत चलवाड,विकास कांबळे,वाल्मीक केंद्रे आदीसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने फसवणूक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
बेरोजगारांच्या असाहाय्यतेचा गैरफायदा घेत काही खासगी कंपन्यांनी लातूर जिल्ह्यात धुमाकूळ घालत तरुणांना गंडविण्याचे काम सुरू केले आहे. यासाठी लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीचा गैरफायदा घेत जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्याऱ्यांनाही जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे बोगस पत्र माध्यमामध्ये फिरविले आहे. दरम्यान, याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने स्पष्टीकरण देत या कंपनीच्या भरती रजिस्ट्रेशन कॅम्पसचा जिल्हाधिकारी कार्यालयाचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे.

एसआयएस इंडिया लिमिटेड या कंपनीत रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यासाठी ऑनलाइन शुल्क घेतले जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने फिरविण्यात आलेल्या पत्रात नमूद करण्यात आले होते. या पत्रात सुशिक्षित बेरोजगारांना सुरक्षा क्षेत्रातील प्रशिक्षण मिळून त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळावा, यासाठी एका खासगी कंपनीद्वारे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये भरती रजिस्ट्रेशन कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. या माध्यमातून नामांकित कंपन्यामध्ये रोजगार उपलब्ध करून येणार असून त्यासाठी ऑनलाइन शुल्क घेतले आणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. हे पत्र जिल्हाधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीने जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी यांना निर्गमित करण्यात आल्याचे भासवण्यात आले होते. बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एका कंपनीने म्हटले होते. परंतू अशी कुठलीच प्रक्रीया नसल्याचे सांगण्यात आले.

### कंपनीवर कारवाई करण्याची मागणी

जिल्हाधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीचा वापर करून जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयांना जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र असल्याचे भासवण्याचा हा प्रकार केवळ खुलासे किंवा स्पष्टीकरण देण्यापुरता नाही. लातूरच्या जिल्हा प्रशासनाचे प्रमुख म्हणून जिल्ह्यातील सर्व बेरोजगारांच्या जीवनाशी खेळणाऱ्या अशा कंपन्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी कडक कारवाई करणे अपेक्षित आहे. नोकर भरतीबाबत सोशल मीडियातून बेरोजगारांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या अनेक कंपन्या असून सर्रास शासनाच्या विविध विभागांची नावे घेत या कंपन्या बेरोजगारांना लुटत आहेत. अशा कंपन्यांवर कारवाईची मागणी होत आहे.

## चोरीच्या ८ मोटारसायकलीसह दोन आरोपीना अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
चोरीच्या आठ मोटार सायकलसह पोलीसांनी दोघाजणांना अटक करण्यात आली असून एक जण फरार आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, काहीजण शिरूर ताजबंद ते मुखेड जाणारे रोडवरील बायपास ब्रिजच्या खाली थांबून संशयितरित्या मोटरसायकली चा खरेदी-विक्री व्यवहार करीत आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर पथक तात्काळ शिरूर ताजबंद ते मुखेड जाणारे बायपास रोडच्या परिसरात पोचून चोरीच्या मोटारसायकलीसह थांबलेल्या इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडील मोटारसायकल संदर्भाने विचारपूस केली असता त्यांनी त्यांनी त्यांचे नाव इम्रान गौस सय्यद, वय २२ वर्ष, राहणार विष्णुपुरी,नांदेड, विठ्ठल महादेव गायकवाड, वय १९ वर्ष, राहणार पांगरी नांदेड,असे असल्याचे सांगितले.

त्यांचा साथिदार मनोज बोडके, राहणार आरळी तालुका बिलोली जिल्हा नांदेड, सध्या राहणार जयभीम नगर, नांदेड, हा फरार आहे. या सर्वांनी पोलीस ठाणे चाकूर हद्दीतून तसेच नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून विविध कंपनीच्या आठ मोटारसायकल चोरी केल्याचे कबूल केले आहे. आरोपीता कडून त्यांनी चोरलेल्या ०३ लाख ३० हजार रुपये किमतीच्या ०८ मोटरसायकली जप्त करण्यात आले आहेत.

# टीबी रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किट वाटप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
पोद्दार ॲक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटर, लातूर व सार्वजनिक आरोग्य विभाग, महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री टीबीमुक्त अभियानांतर्गत टीबी रुग्णांना मंगळवारी न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप करण्यात आले.

लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत मोफत औषधींचा पुरवठा करण्यात येतो. परंतु, औषधासोबतच रुग्ण पूर्णतः ठीक होण्यासाठी आवश्यक पोषण आहाराच्या पूर्ततेसाठी लोकसहभागातून न्यूट्रिशनल सपोर्ट कीट देऊन नि:क्षय मित्र होता येते. नि:क्षय मित्र होण्याची प्रेरणा घेऊन लातूर शहरामधील पोद्दार ॲक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरचे संचालक, प्रसिध्द अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांनी ५० रुग्णांसाठी न्यूट्रिशनल किट देऊन या मोहिमेमध्ये सहभाग नोंदवला. यावेळी टीबी रुग्णांना डॉ. पोद्दार यांच्या मातोश्री मणीबाई पोद्दार व मान्यवरांच्या हस्ते न्यूट्रिशनल किटचे वाटप करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलमार्फत देण्यात आलेले किट हे दातृत्व भावाचे उत्तम उदाहरण असून, समाजातील इतर दात्यांनीही याप्रमाणे या अभियानात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त देविदास जाधव यांनी यावेळी केले. हे न्यूट्रिशनल किट लातूर शहरातील टीबी ग्रस्त रुग्णांना देण्यात येणार असून यामुळे त्यांना मदत होणार आहे, असे मत जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. तांबारे यांनी व्यक्त केले.

डॉ. अशोक पोद्दार हे कायम मोफत आरोग्य शिबिरे, पाणपोई, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरात रुग्णांच्या नातेवाईकांना भोजन, थंडीच्या दिवसांत गरजूंना ब्लँकेटचे वाटप, कोरोना काळात अन्नधान्य किटचे वाटप, दिशा सामाजिक संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याकामी अग्रेसर असतात. टीबीच्या निर्मूलनार्थ समाजातील विविध घटकांनी एकत्रित येऊन सहकार्य करण्याची तयारी ठेवणे अत्यावश्यक झाले आहे, असे मत डॉ. पोद्दार यांनी व्यक्त केले.

यावेळी महापालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. स्वाती मजगे, भावना पोद्दार, डॉ. पल्लवी जाधव आदी उपस्थित होते.

## लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने स्व.गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ जून -**
लोकनेते, भाजपाचे माजी केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री, संघर्षशिल नेतृत्त्व आदरणीय गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त लातूर शहर भाजपाच्यावतीने लातूर शहर भाजपाचे अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गांधी चौक पक्ष कार्यालयातील कार्यक्रमात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



महाराष्ट्र व मराठवाड्याच्या विकासासाठी लातूर व बीडच्या नेतृत्त्वाने सर्वांगिण विकासासाठी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून विकास साधण्याचे काम केलेले आहे. यापुढील कालावधीतही त्याच पध्दतीने पक्षीय व विकासाची कामे होणार आहेत. त्यामुळे त्यांच्या या स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन करीत त्यांच्याच विचारावर आपण सर्वांनी वाटचाल करावी, असा विश्वासही युवा नेते तथा भाजपाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.

यावेळी या कार्यक्रमाला माजी सरचिटणीस प्रदीप मोरे, प्रविण सावंत, रवी सुडे, श्री.सिध्देश्वर मंडलाचे अध्यक्ष सुरेश जाधव, निर्मलाताई कांबळे, रोहित पाटील, काका चौगुले, गोपाळ वांगे, सचिन सुरवसे, रागिणीताई यादव,देवा गडदे, संजय गिर, नितीन कोरे, प्रमोद घुले, ज्योतीराम चिवडे, व्यंकटेश कुलकर्णी, ॲड. गणेश गोजमगुंडे,संतोष तिवारी, सागर घोडके, रविशंकर लवटे, वैभव वनारसे, शशिकांत हांडे, प्रितम मुंडलिक, मंदार कुलकर्णी, मधुसुधन पारीख, किशोर शिंदे, योगेश गंगणे, राजेश पवार उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छ. संभाजीनगर दरोडा प्रकरणात नांदेड कनेक्शन



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०४ जून -**

छत्रपती संभाजीनगर दरोडा प्रकरणात नांदेडच्या व्यापाऱ्यावर सोने खरेदी केल्याचा आरोप आहे. छत्रपती संभाजीनगर पोलीसांनी नांदेडच्या एका सराफा व्यापाऱ्याला ताब्यात घेतले असुन चौकशी सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ८ किलो सोने आणि ४० किलो चांदी चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी प्रथम पाच जणांना अटक केली आणि एका आरोपीचा एन्काउंटर केला. पाच आरोपींना न्यायालयात हजर केल्यानंतर पाचही आरोपींना १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. तपासादरम्यान अरोपींनी चोरीचे सोने नांदेड येथे विक्री केल्याच्या माहितीवरुन छत्रपती संभाजीनगर पोलीस नांदेडात दाखल झाले आहते. नांदेडमधील सराफा व्यापारी लाईन मधील सराफा व्यापारी बाकलीवाल यांना २०० ग्रॅम सोने विकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या कारवाईत संभाजीनगर पोंलीसांनी सराफा व्यापारी व एका सोनाराला ताब्यात घेतले असुन त्यांची चौकशी सुरु आहे.

# सराईत गुन्हेगार पोलीसांच्या गोळीबारात जखमी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.०४ जून -**



विष्णुपुरी येथील कुख्यात गुन्हेगार नेमकाच तुरुंगातून सुटून आल्याने पुन्हा त्याने गुन्हेगारीचे सत्र चालू असल्याचे समजले असता नांदेड ग्रामीणचे पोलीस पथक पाळतीवर होते. पोलीसांना खबर लागतात त्याला घेराव घातला. तेव्हा गुन्हेगारास कळताच त्यांनी आपल्या जवळील पिस्तूल पोलिसांच्या दिशेने रोखली असता ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी त्यांच्या पायावर गोळी झाडली ही घटना विष्णुपुरी परिसरातील पांगरी शिवारात दिनांक ३ जून रोजी रात्री ९:३० वाजता घडली.

विष्णुपुरी येथील सराईत गुन्हेगार प्रभाकर हंबर्डेच्या विरुद्ध विविध ठाण्यात सात पेक्षा जास्त गंभीर गुन्हे दाखल आहेत. दरम्यान मोक्का अंतर्गत कारवाई झाल्याने अनेक महिन्यापासून तो तुरुंगात होता. काही दिवसापूर्वीच तो बाहेर आला होता त्यानंतर ही त्यांची गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली नाही नुकतेच काही दिवसापुर्वी त्याने एकास जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. हा आरोपी पांगरी शिवारात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्याने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर हे पथकासह शोध घेत त्यांच्यापर्यंत पोहोचले तेव्हा पोलीस आपल्या दिशेने आल्याचे पाहून जवळील पिस्तल काढून पोलिसांच्या दिशेने गोळीबार करण्याचा प्रयत्न हंबर्डे यांने केल्यानंतर तेव्हा मोठ्या शिताफिने पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी त्यांच्या दिशेने होळी झाडली ती गोळी त्यांच्या पायात घुसली. यात तो जखमी झाल्याने पोलीसांनी त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.



## संडे ऑन सायकलरॅलीस नांदेडकरांचा उत्सफुर्त प्रतिसाद

**नांदेड, दि.०४ जून -**

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने जागतिक सायकलींग दिवसानिमीत्त संडे ऑन सायकलचे आयोजन रविवार १ जून,२०२५ रोजी सकाळी ७ वा. करण्यात आले होते. या रॅलीत नांदेडकरांनी भरभरुन प्रतिसाद दिला.

सायकल रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सायकल पटुना गुलाबाचे फुल व प्रत्येकांना पाण्याची बॉटल देवून त्यांचे स्वागत केले.

# हिमायतनगर तालुक्यातील कृषी भरारी पथके नावालाच

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.०४ जून -**

तालुक्यात मोठ्या प्रमाणात बोगस बियाणे, रासायनिक खते विक्री रोखण्यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्या वतीने भरारी पथक नेमण्याचे कागदोपत्री सांगण्यात आले आहे. यामध्ये पंचायत समिती कृषी अधिकारी यांच्यासह तालुका कृषी अधिकारी कर्मचाऱ्यांचा सहभाग असलेले भरारी पथक तालुक्यातील कृषी केंद्रामध्ये सर्व बियाणे, रासायनिक खताचे, औषधांचे नमुने गोळा करुन ते तपासणीसाठी राज्यस्तरीय प्रयोगशाळेत अनिवार्य असताना पण हिमायतनगर शहरांमध्ये असे कुठलेही प्रकारचे निदर्शनास न आल्याने भरारी पत्र नावालाच असल्याचे बोलले जात आहे. बोगस बि-बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खते, विविध कंपनीचे औषधी आढळुन आल्यास त्या कृषी केंद्र चालकावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश असतानाही हिमायतनगर तालुक्यातील एकही कारवाई आध्याप झाली नसल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु तालुका कृषी कार्यालय व कृषी विभाग पंचायत समिती कडुन या गंभीर बाबीकडे अद्यापही लक्ष दिले जात नसल्याने या बोगस रासायनिक खते बियाणे विक्रेत्यांचे चांदी होत आहे. तालुकास्तरीय तपासणी भरारी पथक हे नावालाच असल्याने बोगस रासायनिक खते बी-बियाणे, विविध औषधी विकुन शेतकऱ्यांला फसवणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकावर कठोर कार्यवाही सह त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे किंवा कायम स्वरुपी दुकानाचे परवाने निलंबित करण्याचे आवाहन करण्यात आले असताना, तालुकास्तरीय तपासणी भरारी पथक अद्याप एक ही दुकानदारांवर कारवाई करताना दिसुन येत नाही. विविध बि-बियाण्याची व रासायनिक खते, विविध औषधी यांचा नमुना अहवाल दुकानांच्या दर्शनी भागात लावणे गरजेचे आहे.तालुका कृषी कार्यालय व पंचायत समिती कृषी विभागाच्या तालुकास्तरीय पथका कडुन अद्याप ही एकाही कृषी दुकानदाराची तपासणी किंवा कार्यवाही केली नसल्याने तालुकास्तरीय भरारी पथक व कृषी दुकानदारामध्ये संगनमत असल्याचा आरोप यावेळी होत आहे.परंतु रासायनिक खतामध्ये डीएपी व युरियाची कृत्रिम टंचाई असल्या कारणाने त्यांना जादा दराने ज्यादा पैसे देऊन रासायनिक खते व बी-बियाणे खरेदी करावी लागत असल्याने, पुन्हा एकदा शेतकऱ्यांची पिळवणुक होत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या यांच विश्वासाचा गैरफायदा घेत तालुक्यातील अनेक कृषी केंद्र चालक राज्यात प्रतिबंधित असलेल्या तसेच लगत राज्यातील तेलंगणा व गुजरात, मध्यप्रदेश राज्यातील बोगस कंपनीचे सोयाबीन, संकरित कापुस बियाणे, तसेच विविध रासायनिक व सेंद्रिय खते, विविध औषधी अशा बोगस कंपन्याचे ऑनमध्ये चढ्या दराने विकुन शेतकऱ्यांची दिवसाढवळ्या फसवणुक करुन आर्थिक पिळवणूक करत असताना, ता लुकास्तरीय व जिल्हा भरारी पथक मात्र नावालाच असल्याचे बोलल्या जात आहे.

## संक्षिप्त वृत्त

### छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम

**नांदेड**-छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळयास ३५० वर्ष पुर्ण झालेले आहेत. दिनांक ६ जून २०२५ रोजी राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या सोहळयाचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या व्हिडिओ संदेशांद्वारे कार्यक्रमांचा शुभारंभ होणार आहे. राज्याभिषेक सोहळयाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी, माजी विद्यार्थी, स्थानिक उद्योजक यांच्या सहभागातून नाविन्यता प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे शुक्रवार ६ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रम घेण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हयातील प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त संख्येने प्रशिक्षणार्थ्यांनी, पालकांनी उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन संस्थेचे प्राचार्य सचिन सुर्यवंशी यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक १६७४ साली रायगड किल्लयावर संपन्न झाला. त्यांच्या राज्याभिषेकास ३५० वर्ष पुर्ण झालेले आहेत. त्यांचे प्रेरणादायी जीवन आजही समाजाला प्रेरणा देते.

### राष्ट्रवादी युवक काँग्रेस किनवट तालुका आढावा बैठक उत्साहात

**किनवट**-राष्ट्रवादी युवक काँग्रेस नांदेड जिल्ह्याचे नवनियुक्त अध्यक्ष स्वप्निल भाऊ इंगळे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट तालुक्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसची आढावा बैठक उत्साहात पार पडली.



तालुक्यात युवक संघटनेची घडी मजबूत करण्यासाठी आणि अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा ठोस कार्यक्रम यावेळी ठरविण्यात आला. या बैठकीचे नियोजन राष्ट्रवादी युवक काँग्रेस किनवट तालुका अध्यक्ष संजय भाऊ सिडम आणि नांदेड जिल्हा सरचिटणीस विशाल भाऊ जाधव यांनी केले होते. बैठकीदरम्यान तालुक्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सदस्यत्व वाढवण्यावर भर देण्यात आला. आगामी काळात युवकांमध्ये अधिक जोमाने काम करत संघटनेचे नेटवर्क वाढवण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला. या बैठकीस राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नेते सुगत नगराळे, विधानसभा अध्यक्ष वैजनाथ खरपुडे पाटील, माजी नगराध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते इशा खान साहेब, मोनू गायकवाड, विकी शेंडे, मोहनभाई शेख, किनवट शहराध्यक्ष इलियास मोहम्मद, नवीन जाधव, चेतन मुंडे, माजी नगरसेवक इम्रान खान, समीर जायभाय, निखिल डांगे, बंटी गोरे, लकी राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी कार्यकर्त्यांनी पक्षासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार केला.

# स्पर्धेच्या काळात तरुणांना व्यावसायात मोठ्या करिअरच्या संधी : प्रणितताताई देवरे

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०४ जून -**

तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत आपण निवडलेल्या व्यवसायाला आधुनिकतेचा टचदेऊन त्यात यश मिळविता येते असे मार्गदर्शन भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी केले अन्वर पठाण या युवकांचा फ्रेन्डस ड्रायक्लिनर्सचे उदघाटन भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा प्रविणताताई देवरे - चिखलीकर याच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी उपनगराध्यक्ष दत्ताजी वाले, माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार, अवि पाटील पवार, अशोक सोनकांबळे, सिकंदर शेठ, रशिदखॉ पठाण, आलमखॉ पठाण, अहेमद शेख, ऐजाज शेख, रमजान पठाण, सोहेल पठाण काबेगांवकर, अरबास शेख, रज्जाक शेख, खोलेद पठाण, समीर शेख, सरफराज लदाफ, ताहेर पठाण, अयान शेख, साहिल शेख, साहील पठाण व अजीस शेख आदींची उपस्थीती होती .उदघाटक प्राणिताताई देवरे चिखलीकर म्हणाल्या की, आज प्रचंड स्पर्धा आहे सरकारी नौकरी साठी जागा मोजक्याच आणि हजारो विद्यार्थी परीक्षेसाठी असतात .असा स्पर्धेत सगळ्यांनाच संधी मिळणार नाही म्हणून तरुणांनी रोजगाराच्या संधी शोधल्या पाहिजे .अन्वर पठाण व सहकाऱ्यांनी शहरात ड्रायक्लिनिक हा व्यवसाय साकारला मेहनत जिद्द, चिकाटीतून तसेच दर्जे दारपणा व्यवसायाला भरभराटी देते हे सगळे .त्यासाठी अन्वर व सहकारी हे प्रयत्नशील असतील त्याच्या व्यवसायाची गती वाढावी असा शुभाकामना प्राणिताताई यांनी व्यक्त केल्या.

# घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या हक्काची मोफत रेती त्वरित घेऊन जावी : आ. राजेश पवार

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.०४ जून -**

नायगाव मतदार संघातील घरकुल लाभार्थ्यांनी हक्काची मोफत रेती त्वरित घेऊन जावी असे आवाहन नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पवार यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने घरकुल योजना लाभार्थ्यांना पुन्हा एकदा पाच ब्रास मोफत रेतीचे वितरण सुरू झाले असून उमरी तालुक्यातील कौडगाव या रेती घाटावर धर्माबाद व उमरी तालुक्यातील लाभार्थ्यांना मोफत रेती वितरण कार्यक्रम नुकताच नांदेड दक्षिणच्या भाजपाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा पुनमताई पवार यांच्या हस्ते संपन्न झाला.घरकुल बांधकाम ज्यांचे अपूर्ण आहे जे की दोन ते तीन वर्षापासून, ज्यांनी पहिला हप्ता उचलला व रेती मुळे त्यांचे घरकुल पूर्ण झाले नाही अशा लाभार्थ्यांना रेती वितरण उपरोक्त घाटावरून चालू झालेलं आहे. त्यासंबंधीचे पासेस त्यांना दिलेले आहेत तद्वतच ऑनलाइन प्रणाली मध्ये काही जणांचे आधार अपडेट न झाल्यामुळे व मोबाईल लिंक नसल्यामुळे रेती वितरण होत नाही अशांनी तात्काळ आपले आधार अपडेट करून घेण्याचे आवाहनही आमदार राजेश पवार यांनी करत अपूर्ण बांधकाम लाभार्थ्यांनी आपल्या ग्रामसेवकांशी संपर्क करावा, आधार अपडेट करावे व पास घ्यावा असेही प्रतिपादन त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले.

**आमदारांच्या व्हॉटस ॲप नंबरवर संपर्क साधावा**

महसूल विभागातील रेती धंद्यामध्ये संगणमत असलेले अधिकारी अथवा रेती माफिया यांच्याकडून घरकुल लाभार्थ्यांच्या मोफत रेतीचा गैरफायदा होण्याची फार मोठ्या प्रमाणात शक्यता निर्माण झाली असून घरकुल लाभार्थ्यांनी यासंदर्भात सतर्क रहावे व आपल्या पासचा दुरुपयोग रेती माफिया किंवा संबंधित संगणमत असलेले अधिकारी करणार नाहीत आणि जर का तसे आढळले तर आमदार राजेश पवार यांच्या व्हाट्सअप वर तात्काळ कळवावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

**कौडगाव रेतीघाट निश्चित**

धर्माबाद व उमरी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती साठी उमरी तालुक्यातील कौडगाव रेतीघाट निश्चित करण्यात आले असून ही मोफत रेती योजना फक्त नऊ जून पर्यंतच चालू राहणार असून लाभार्थ्यांनी या गोष्टीकडे लक्ष देऊन तात्काळ आपल्या हक्काची मोफत रेती ताब्यात घ्यावी असे आवाहनही आमदार राजेश पवार यांनी केले.

# हदगावचे नायब तहसीलदार मुगाजी काकडे माहूरचे अतिरिक्त तहसीलदार

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.०४ जून**



तहसिलदार किशोर यादव, माहूर, जि. नांदेड यांना बदलीने दिलेल्या पदस्थापनेवर रूजू होणेसाठी दि.०२ जुन रोजी (म.पू.) कार्यमुक्त करण्यात आले असून जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या आदेशानुसार त्यांच्याकडील सद्य पदाचा पदभार मुगाजी काकडे, नायब तहसिलदार (म) तहसिल कार्यालय हदगाव यांचेकडे माहूर तहसीलचे अतिरिक्त तहसीलदार स्वरूपात पुढिल आदेशापर्यंत सोपविण्यात आला असून, त्यांनी पदभार स्वीकारला आहे.

बदली झालेले माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांच्या जागेवर शासन, महसूल व वनविभाग यांच्या कडून कायमस्वरूपी नवीन तहसीलदाराची पदस्थापना देण्यात न आल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दि. ०२ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथून काढलेल्या एका लेखी आदेशानुसार माहूर तहसील कार्यालयात अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेले मुगाजी काकडे, नायब तहसिलदार (म) तहसिल कार्यालय हदगाव यांनी माहूर तहसील कार्यालयात आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे.




# श्री जगदंबा विद्यालयाच्या वर्गमित्र-मैत्रिणींचे तब्बल २२ वर्षानंतर भरले स्नेहसंमेलन

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.०४ जून -**



येथील श्री जगदंबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सन २००३ ते २००६ मधील १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या बॅचच्या वर्गमित्रांचे व शिक्षकवृंदाचे तब्बल २२ वर्षानंतर एकत्र भेटत माहूरच्या इतिहासात पहिल्यांदाच एकत्रित स्नेहसंमेलन स्थानिक बालाजी मंगलम् कार्यालयाच्या भव्य सभागृहात शनिवारी ३१ रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. या गेट टुगेदर कार्यक्रमात तत्कालीन वर्गमित्र ते वर्तमान मित्र ज्यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनी आणि शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यावेळी वर्गमित्र-मैत्रिनींनी आपल्या प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यालयीन, कनिष्ठ महाविद्यालयीन काळातील अनेक स्मृतींना उजाळा दिला. तर प्रथम संस्कार गुरू आई- बाबा यांच्या नंतर योग्य शिकवण देऊन लायक बनविणारे शिक्षण गुरू उपस्थित सर्व शिक्षक-शिक्षिकावृंदाचा सर्व स्नेहीयांनी उचित सत्कार-सन्मान करत सादर पदस्पर्षाने पुढील आयुष्यासाठी आशिर्वाद घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यालयाच्या सेवानिवृत्त शिक्षिका मंगलाताई मुनेश्वर ह्या होत्या. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विश्वास जाधव,अरुण कोरटकर ,आर. वाय. राठोड,एन.जी.गोडसे,तिवारी,भिसे, जगताप,केशव पोपुलवार, दवने, उमाकांत कपले या शिक्षक,प्राध्यापक वृंदांसह मस्के,कामोद सोनकर,वसंता खंदारे हे शिक्षकेतर कर्मचारीवृंदांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी तत्कालीन विद्यार्थी तथा वर्गमित्र विद्यमान भाजपा नगरसेवक सागर महामुने, ड. उज्वल भोपी, उद्योजक सागर दुधे, कृषी उद्योजक परेश देशपांडे, शिवसेनेचे ता.संघटक विनोद सूर्यवंशी,विकास कपाटे, पूजारी तथा गुरुजी अनुदीप कोरटकर यासह शैलेश वाघमारे स्वप्निल पवार सतिश चौधरी,विशाल उबाळे,विकास मरमट,विजय शिकारे, गौरव पलिकुंडवार,बाजीराव ससाने,जयकांत मोरे, दिपक किंगरे, विनायक शेवाळे,प्रविण राठोड,चेतन धनावत,संतोष वाकेकर, गजानन लाडे, गजानन रावते,नुरखान पठाण, तोफीक खाजा, मोसिन शेख, मुजिब फारुकी या वर्गमित्रांसह शितल मध्येवार, धनश्री आमले, सोनाली डाखोरे,प्रिया चंदेल,दिपाली गायकवाड,निकिता सुने,अनिता लसंते सुजाता कांबळे, प्रज्ञा गवळी,अनिता कोनडे,प्रिती लिगदे,दिपाली सावळकर वैशाली राऊत या वर्गमैत्रिनींची उपस्थिती होती.तब्बल २२ वर्षानंतर एकाच छताखाली एकत्र भेटल्याचा आनंद यादरम्यान आलेल्या जीवनातील सुखदुःखाच्या अनुभवातून व तत्कालीन शालेय जीवनातील आठवणींच्या हिंदोळ्यातून विचार व्यक्त करताना आपल्या भावना अनेकांनी बोलून दाखवल्या.यावेळी सर्व वर्गमित्र व वर्गमैत्रिनींनी सदरील गेट टुगेदर हे केवळ एक भेट किंवा मनोरंजनाचा कार्यक्रम नसून, यात तब्बल २० वर्षानंतर एकत्र येऊन सर्वांनी जणू शाळेतील तो एक दिवस पुन्हा जगून घेतला असल्याच्या बोलक्या भावना यावेळी सर्व वर्गमित्र व वर्गमैत्रिनींनी या स्नेहसंमेलनात आपल्या प्रिय गुरुजनांसह, गुरुमाऊलींपुढे बोलून दाखवल्या.शिक्षक,शिक्षिका यांचे उचित मार्गदर्शन, शाळेतील खेळ, स्नेह भोजनाचा आनंद आणि एकमेकांपासून दूर गेलेले मित्र,मैत्रिणी यात काही शासकीय सेवेत,काही मोठ्या नामांकित कंपन्यांत,तर काही राजकीय क्षेत्रात, काही व्यापार-उद्योगधंद्यात तसेच काही शेती व्यवसायात कार्यरत असून,सर्वजण एक दिवस आपल्या वेळेतील वेळ काढून या स्नेहसंमेलनाचे कार्यक्रमा साठी उपस्थित राहिले हे खरोखरच अभिनंदनीय असल्याचे नगरसेवक सागर महामुने यांनी सांगितले.या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आलेल्या अनुभवाने हे आयुष्यात पुन्हा पुन्हा न येणारे भावूक आणि अनमोल क्षण त्यांनी अंतरात साठवून घेतले आहे! असे भावनिक विचार अध्यक्षीय समारोप करताना मंगलाताई मुनेश्वर यांनी बोलून दाखवले. प्रास्ताविक सतीश चौधरी यांनी तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विकास कपाटे आणि दीपाली गायकवाड यांनी केले.शेवटी आभार प्रदर्शन धनश्री आमले व कार्तिक उत्तरवार यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...

### लाईन ब्लॉकमूळे काही रेल्वे रद्द तर काही रेल्वे अंशतः रद्द

**परभणी,/प्रतिनिधी :** हैदराबाद विभागातील निझामाबाद ते मुदखेड दरम्यान ट्रॅफिक ब्लॉकमुळे जून २०२५ मध्ये काही रेल्वे गाड्या काही दिवस रद्द करण्यात आल्या आहेत तर काही अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत.

गाडी क्रमांक ७७६४५-७७६४६ निजामाबाद - नांदेड-निजामाबाद ही डेमू रेल्वेगाडी ३,५,६ व ९ जून रोजी पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. तसेच गाडी क्रमांक ११४०९ दौंड - निजामाबाद डेमू ही गाडी २,४,५, व ८ जून रोजी मुदखेड ते निजामाबाद दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. तर गाडी क्रमांक ११४१३ निजामाबाद - पंढरपूर डेमू ही गाडी ३,५,६ व ९ जून रोजी निजामाबाद ते मुदखेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने दिली.

### सेवानिवृत्तीनिमित्त कुलकर्णी यांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील प्र. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता सुहास सुधाकरराव कुलकर्णी हे ३१ मे रोजी अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य (गृह विभाग) यांच्या आस्थापनेवरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.

कुलकर्णी यांनी शासन सेवेत एकूण २३ वर्ष सेवा केली असून न्यायालयात अभियोग पक्षातर्फे सरकार पक्षाची भक्कमपणे बाजू मांडली. तसेच त्यांनी जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे कार्यरत असताना अनेक पोलीस अधिकारी यांना प्रशिक्षण दिले आहे. अत्यंत मनमिळावू व्यक्तीमत्व व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेले कुलकर्णी हे ३१ मे रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

दरम्यान, कुलकर्णी यांच्या सेवानिवृत्त निमित्त निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमास जिल्हयातील सर्व सरकारी अभियोक्ता व कर्मचारी यांनी उपस्थित राहून कुलकर्णी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### एमडिओ संघटनेचे मनपा आयुक्तांना साकडे

#### बकरी ईदनिमित्त कुर्बानीसाठी ठराविक ठिकाणी आवश्यक व्यवस्था करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ७ ते ९ जून दरम्यान राज्याच्या गोवंश हत्याबंदी कायद्यांची अंमलबजावणी करुन कुर्बानीसाठी तात्पुरत्या स्वरूपात ठराविक ठिकाणी नागरिकांना आवश्यकतेनुसार विविध व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी मायनॉरिटी डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनने महापालिका आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

एमडिओ संघटनेचे जिल्हाध्यक्ष सय्यद रफीक पेडगावकर, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष शेख उस्मान शेख इस्माईल, सचिव शेख शमशोद्दीन खाजा मोईनोद्दीन यांनी सोमवारी महापालिका आयुक्तांना विविध मागण्यांसंदर्भात एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, मुस्लिम बांधवांची बकरी ईद बुधवार ७ जुन रोजी साजरी होत आहे. त्यानिमित्त मुस्लिम बांधवांना ईद-उल-अजहाची नमाज अदा करण्यासाठी ईदगाह मैदानांवर साफसफाई व वजूसाठी पाणी, सुरक्षा देण्यात यावी. महापालिकेकडून कुर्बानीसाठी तात्पुरत्या स्वरूपात सर्व ठराविक ठिकाणी पाणी, मंडप, तसेच वेस्ट घाणीची साफसफाईसाठी घंटा गाडी, पुरेसे मनुष्यबळ पुरविण्याची व्यवस्था करावी, म्हैसवर्गीय व बकरे प्राण्यांची नोंद करून परवानगी देण्यासाठी सक्षम अधिकारी, कर्मचारी ठेवण्यात यावे. शहरात ठिकठिकाणी घाण पसरु नये म्हणून मुस्लिम बांधवांनी कुर्बानी घरात न करता मनपाने ठराविक ठिकाणी करण्याचे आवाहन मनपाच्या वतीने प्रसारमाध्यमांतून करण्यात यावे. तसेच नागरिकांची कुर्बानीसाठी हेळसांड होऊ नये म्हणून आवश्यक व्यवस्था उपलब्ध करावी, आदी मागण्या मायनॉरिटी डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनने या निवेदनाद्वारे केल्या आहेत.

### मोहम्मद लियाकत अन्सारी यांचा शिवसेनेत प्रवेश

**पाथरी,/प्रतिनिधी :** काँग्रेसचे महाराष्ट्र जनरल सेक्रेटरी तथा माजी नगरसेवक व परभणीचे जेष्ठ ओबीसी नेते मोहम्मद लियाकत अन्सारी यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह आज सोमवारी (दि. २ जुन) शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

शिवसेनेचे अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मोहम्मद लियाकत अन्सारी यांच्यासह कलीम भाई कोपवाले आणि शेख कासिम यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना विधानसभा प्रमुख पप्पू घाडगे, ओबीसी जिल्हाप्रमुख विठ्ठल रासवे, माजी उपनगराध्यक्ष अप्सर अली, जिल्हाप्रमुख नाना टाकळकर, बालाजी कुऱ्हाडे, हाजी कुरेशी, खालेद शेख, मोहसीन शेख इत्यादींची उपस्थिती होती. या प्रवेशामुळे परभणीत शिवसेनेला बळकटी प्राप्त झाली आहे.

### टोयोटा-पिकअपचा अपघात; एकाचा मृत्यू: राहाटी परिसरातील घटना

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ते वसमत रस्त्यावरील राहाटी गावाजवळ रविवारी (दि.१ जुन) टोयोटा कंपनीची गाडी व लोंडींग पिकअप या दोन वाहनांच्या भिषण अपघातात आलेगाव येथील एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

पूर्णा तालुक्यातील आलेगाव येथील नितिन मारोतराव सवराते (वय ३१) हे रविवारी रात्री १.३० च्या सुमारास परभणी-वसमत रस्त्यावरील राहटी पाटी परिसरात टोयोटा कंपनीची गाडीने (गाडी क्र.एम.एच. - २० जीव्ही - ७६८७) जात होते. त्यावेळी पुढील दिशेने येणाऱ्या पिकअप वाहनासह (एमएच - २६ सीएच-०४०१) भिषण अपघात झाला. या अपघातात सरावते यांचा जागीच मृत्यू झाला.

संतोष चांदोजी सवराते (रा.आलेगाव) यांनी ताडकळस पोलीसांना दिलेल्या तक्रारीच्या आधारे पिकअप चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस जमादार आप्पाराव वऱ्हाडे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दुर्राणी यांचा पक्षप्रवेश

## ८ जून रोजी होणार कार्यक्रम : पाथरीत भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन व शक्तीप्रदर्शन

**मोहन धारासूरकर**
**परभणी,/प्रतिनिधी-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत माजी आमदार बाबाजानी दुर्राणी ८ जून रोजी राष्ट्रवादीत प्रवेश

पाथरीत भव्य शेतकरी मेळावा : शक्तीप्रदर्शन होणार असल्याची माहिती यावेळी देण्यातआली आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी हे ८ जून रोजी पाथरीत आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी (अजित पवार गट) प्रवेश करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठी दुफळी पडल्यानंतर माजी आमदार दुर्राणी यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादीने (शरदचंद्र पवार पक्ष) महाविकास आघाडीतून पाथरी मतदारसंघ राष्ट्रवादीच्या हिश्श्यास बहाल न केल्याने दुर्राणी हे कमालीचे नाराज झाले होते. त्यामुळेच दुर्राणी यांनी या नाराजीपोटी विधानसभा निवडणूकीत अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उडी



मारली. या निवडणूकीत ते पराभूत झाले. त्यामुळे पुढील राजकीय वाटचालीबद्दल प्रश्नचिन्ह उभे राहिले असतांना दुर्राणी यांनी सत्तारुढ राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्या संदर्भात गेल्या चार-सहा महिन्यापासून हालचालीही सुरु होत्या. विशेषतः प्रदेशाध्यक्ष तटकरे यांच्याबरोबर त्यांचे गुफ्तगूसुध्दा झाले होते. अखेर दुर्राणी यांच्या पक्षप्रवेशास ८ जून असा मुहूर्त लागला.

पाथरी येथील जिल्हा परिषद मैदानावर दुर्राणी यांनी या पक्षप्रवेश सोहळ्याच्या निमित्ताने शेतकरी मेळावा आयोजित केला आहे. त्यास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह अन्य नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याच्या यशस्वीतेकरीता दुर्राणी यांनी मोठी कंबर कसली असून या मेळाव्यातून जोरदार शक्ती प्रदर्शन करतील, अशी चिन्हे आहेत.

### आ.बाबाजानी दुर्राणी यांचा परभणीत जोरदार सत्कार...

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महानगर जिल्हा शाखेतर्फे माजी आमदार दुर्राणी यांचा बुधवारी पक्ष कार्यालयात भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता. प्रथम महापौर तथा महानगर जिल्हाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या या सर्व सेलचे पदाधिकारी तसेच माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यातून १० जून रोजी पुण्यात होणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिन मेळाव्यास हजेरीसह ८ जून रोजी पाथरी येथील शेतकरी मेळाव्यास सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**

## पिंगळगड नाल्यावरील पुल भयावह अवस्थेत- कृषि विद्यापीठांतर्गत रस्ता, आठ-दहा गावातील ग्रामस्थ हैराण

**परभणी,/प्रतिनिधी :** पिंगळगड नाल्यावरील पूल भयावह अवस्थेत

कृषि विद्यापीठांतर्गत रस्ता : आठ-दहा गावातील ग्रामस्थ हैराण : लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याचे जाणून आले.

दरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रक्षेत्रातून वाहणाऱ्या पिंगळगड नाल्यावरील पुल अक्षरशः भयावह अवस्थेत असून या पूलावर दररोज छोटे-छोटे अपघात अक्षरशः नित्याचेच झाले आहेत. धोकादायक अवस्थेतील हा पूल कधीही कोसळेल, अशी चिन्हे आहेत.

कृषि विद्यापीठांतर्गत मध्यवर्ती प्रक्षेत्रातून पिंगळगड नाला वाहतो आहे. मध्यंतरी या नाल्याच्या खोलीकरणासह रुंदीकरणा संदर्भात कामे सुरु होती. त्यामुळे या नाल्याचे पुनरुज्जीवन होईल, असे अपेक्षित होते. परंतु, माशील कुठे शिंकली कळले नाही. या नाल्यांचे पुनरूज्जीवन तर राहिले दूर, खोलीकरण व रुंदीकरणाची कामेसुध्दा संबंधित एजन्सीधारकाने अक्षरशः थातूर मातूर पध्दतीने उरकली. पुढे कामे सरकलीच नाहीत. त्या अवस्थेतील या नाल्यातून पाणी पावसाळ्यात कसबसे वाहत आहे. त्यातून विद्यापीठातील शेकडो हेक्टर जमीन नापिक बनली आहे. परंतु, त्याचे सोयरसुतक कोणालाही नाही, हे वास्तव आहे. या नाल्यावर एक पूल आहे. या पुलावरुन तालुक्यातील आठ-दहा गावांचा संपर्क सुरु आहे. विशेषतः टाकळगव्हाण, परळगव्हाण, इटलापूर, लोहगाव, सायाळा वगैरे गावातील ग्रामस्थांना पिंगळगड नाल्यावरील हा पूल संपर्काच्या दृष्टीने अक्षरशः सोयीचा आहे, परंतु गेल्या दोन-चार वर्षांपासून हा पूल धोकादायक अवस्थेत उभा आहे. ठिकठिकाणी हा पूल उखडला आहे. सिमेंटच्या या पुलास तडे गेले आहेत. पूल कधी कोसळेल, हे सांगता येत नाही. पूलावरुन सातत्याने पाणी वाहिल्याने पूल पूर्णतः खचला आहे. या पुलावरुन चारचाकी वाहन तर जावूच शकत नाही. दुचाकी वाहनेसुध्दा आता जाईनाशी झाली आहेत. कारण या पूलावर पडझडीमुळे दररोज अपघात घडत आहेत. धोकादायक अवस्थेतील या पुलाने अनेकांना जायबंदी केले आहे.

दरम्यान, विद्यापीठ प्रशासन, बांधकाम विभाग यांनी या पुलाची दुरावस्था ओळखून त्या पुलाच्या पुनरुज्जीवनाकरीता प्रयत्न करावेत व आठ-दहा गावच्या ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## नांदेड-निझामुद्दीन आणि जालना छपरा एक्सप्रेसमध्ये डब्यात वाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रवाशांचा प्रतिसाद लक्षात घेता दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड-निझामुद्दीन एक्स्प्रेस मध्ये ४ तर जालना-छपरा व तिरुपती -श्री साईनगर शिर्डी या विशेष एक्स्प्रेसमध्ये प्रत्येकी ०२ डब्यांची कायमस्वरुपी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने दिली.

गाडी क्रमांक १२७५३ / १२७५४ नांदेड- निझामुद्दीन-नांदेड साप्ताहिक एक्स्प्रेस मध्ये एक द्वितीय श्रेणी वातानुकुलीत, दोन तृतीय श्रेणी वातानुकुलीत तर एक द्वितीय श्रेणी शय्या (स्लीपर) असे चार डब्बे नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत १० जून २०२५ पासून आणि निझामुद्दीन येथून सुटणाऱ्या गाडीत ११ जून २०२५ पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढी नंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २२ झाली आहे.

तसेच गाडी क्रमांक ०७६५१/०७६५२ जालना- छपरा-जालना एक्स्प्रेस मध्ये एक द्वितीय श्रेणी वातानुकुलीतआणि एक द्वितीय श्रेणी शय्या (स्लीपर) असे दोन डब्बे जालना येथून सुटणाऱ्या गाडीत ०४ जून २०२५ पासून आणि छपरा येथून सुटणाऱ्या गाडीत ०६ जून पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढीनंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २४ झाली आहे. तर गाडी क्रमांक ०७६३७/०७६३८ तिरुपती-श्री साईनगर शिर्डी - तिरुपती विशेष गाडी मध्ये दोन द्वितीय श्रेणी शय्या (स्लीपर) चे डब्बे तिरुपती येथून सुटणाऱ्या गाडीत ८ जून पासून झाली.

## आश्रम शाळेतील भ्रष्टाचारा संदर्भात आ.भांबळेची तक्रार

**जिंतूर,/प्रतिनिधी :** आश्रम शाळेतील अग्नीसुरक्षा प्रतिबंधित साहित्यात मोठा भ्रष्टाचार मा.आ.विजय भांबळे यांची मुख्य सचिव मंत्रालयात लेखी तक्रार

जिंतूर:- ०३ जून, जिंतूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात आश्रम निवासी शाळेत अग्नीसुरक्षा प्रतिबंधित साहित्य बसवण्याच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून लाखो रुपयाची शासनाची गुत्तेदार यांनी फसवणूक केल्याची तक्रार विविध पुराव्यासह मा.आ.विजयराव भांबळे यांनी लेखी स्वरुपात मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई येथे केली आहे.

जिंतूर तालुक्यातील वझर, चारठाणा, कुऱ्हाडी, इटोली, गडदगव्हाण येथील आश्रमशाळेत अग्नीसुरक्षा साहित्य बसवण्याचे काम एका गुत्तेदाराने घेतले असून इस्टीमेट प्रमाणे कोणतेही साहित्य शाळेला दिले नाही, काही शाळामध्ये अर्धवट साहित्य तर काही शाळामध्ये निकृष्ठ दर्जाचे साहित्य देऊन शासनाची दिशाभूल करत लाखो रुपयेचे देयके उचलून घेऊन मोठा भ्रष्टाचार केला आहे. तसेच यात आश्रम शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी यांच्या जीवाशी खेळ केला असून बोगस व अर्धवट साहित्याने आग लागल्यास जीवित हानी होऊ शकते तसेच यात अनेक अधिकारी,, कर्मचारी देखील सहभागी असून सदर प्रकारची वरिष्ठ स्तरावर सखोल चौकशी करून दोषींविरुद्ध कडक कार्यवाही करण्यात यावी व संबंधित भ्रष्ट गुत्तेदार यास काळ्या यादीत टाकावे तसेच शासनाचे हडप केलेलं पैसे केले.

## कुलगुरु मणि यांचा सुपर ज्युरी म्हणून सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी :** पेज पुणे येथे आयोजित 'पुणे ॲग्री हॅकेथॉन' कार्यक्रमात केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. इंद्र मणि यांचा 'सुपर ज्युरी' म्हणून सन्मान करण्यात आला.

पुण्यातील सिंचन नगर येथील कृषी महाविद्यालयात १ ते ३ जून दरम्यान पहिले 'पुणे ॲग्री हॅकेथॉन' आयोजित करण्यात आले होते. या हॅकेथॉनच्या आयोजनामध्ये महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे आणि कृषी महाविद्यालय पुणे यांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यक्रमात १४० हून अधिक नव्या कृषी तंत्रज्ञान संकल्पनांना वाव देण्यासाठी स्टॉल्स उपलब्ध करण्यात आले



होते. या हॅकेथॉनमध्ये ५५० हून अधिक स्टार्टअप्स आणि कंपन्यांनी सहभाग घेतला होता, त्यातील १५० कंपन्यांची निवड करण्यात आली होती. हॅकेथॉनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट शेती, मातीचे आरोग्य, कृषी यांत्रिकीकरण, हवामान अंदाज, जल व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांतील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांपासून ते स्टार्टअप्सपर्यंत सर्वांनी सहभाग घेतला होता.

केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते मंगळवार ३ जून रोजी पुणे येथे 'पुणे ॲग्री हॅकेथॉन'च्या पारितोषिकांसाठी संस्था निवडणाऱ्या सुपर ज्युरी, ज्युरी आणि इनक्युबेशन पार्टनर्स यांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, कृषि मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री भरत गोगावले, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांना सुपर ज्युरी म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, माजी कुलगुरू डॉ. आर. बी. देशमुख, माजी कृषी आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, नॅचरल शुगरचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे आणि सह्याद्री फार्मचे अध्यक्ष विलास शिंदे यांचाही सुपर ज्युरी म्हणून सन्मान झाला.

या हॅकेथॉनमध्ये एकूण १६ बक्षिसे देण्यात आली, ज्यात पहिले बक्षिस २५ लाखांचे आणि दुसरे बक्षिस १५ लाखांचे होते. या बक्षिसांच्या माध्यमातून विजेत्या संकल्पनांना कृषी क्षेत्रात प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची संधी मिळणार आहे. या हॅकेथॉनच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञान आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यात आले आहे, ज्यामुळे भारतीय शेतीला अधिक स्मार्ट आणि टिकाऊ बनवण्याचा मार्ग मोकळा होईल. दरम्यान, भारतातील पहिल्या ॲग्री हॅकेथॉनचे ३ जून रोजी पुण्यात यशस्वी समारोप झाला.

## अखेर सेलूत ३२ वर्षानंतर वर्गमित्र भेटनी भारावले

**सेलू ,/प्रतिनिधी-** येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित नूतन विद्यालयाच्या १९९३ च्या दहावी बॅचचे स्नेह मिलन रविवार एका हॉटेल मध्ये उत्साहात संपन्न झाले. स्नेह मिलन सोहळ्यात नूतन विद्यालयाचे ८० माजी विद्यार्थी एकत्र आले होते. ३२ वर्षांनंतर आपल्या वर्गातील मित्रमैत्रिणींना पाहून सर्व भारावून गेले. आपल्या बाल मित्रमैत्रिणींच्या भेटीचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावरुन ओसंडून वाहत होता.



स्नेह मिलन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी पुणे, नागपूर , सेलू, हैदराबाद, तसेच राज्याच्या विविध भागातून मित्रमैत्रिणी एकत्र आले होते. ३२ वर्षांनंतर आपल्या वर्ग मित्रमैत्रिणीचे बदललेले रुपडे बघुन झालेले नवल चेहऱ्यावर लपत नव्हते. एकमेकांची ख्यालीखुशाली विचारण्यात सुरुवातीचा वेळ गेल्या नंतर व्यासपीठावर येवून प्रत्येकाने स्वतः चा परिचय देऊन आपण सध्या काय करतो हे सांगितले. दुपारच्या सत्रात काही मित्र मैत्रिणींनी काव्य वाचन केले. तसेच आपल्या शालेय जीवनातील रम्य आठवणींना उजाळा देत भूतकाळ जागवला . तर काहीनी गीत गायन केले.

पुढील वर्षी स्नेह मिलन कार्यक्रम सेलू येथे आयोजित करण्याचा ठराव घेवून जड अंतःकरणाने सर्वांनी निरोप घेतला. माजी विद्यार्थी स्नेह मिलन यशस्वीतेसाठी आनंद माणकेश्वर, ॲड पंकज बोराडे, आदिती दशरथी, मधुरा आनंद गावकर, सुषमा शिकारे, अनुराधा देशपांडे, डॉ. सतीश मगर, राहुल रणशिंग, स्वप्निल टाकळकर, उमेश भोपी यांनी पुढाकार घेतला.

## २७ जुलै रोजी 'कै. सौ. वत्सलाबाई राके' स्मृती बुध्दीबळ स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील सर्व बुध्दीबळ खेळाडू मोठ्या आतूरतेने वाट पाहत असणाऱ्या 'कै. सौ. वत्सलाबाई राके स्मृती बुध्दीबळ स्पर्धा' २७ जूलै रोजी परभणीत होणार आहे.

मागील २८ वर्षापासून दरवर्षी नियमितपणे परभणी जिल्हा बुद्धिबळ संघटनेतर्फे आयोजित केली जाणारी 'कै. सौ. वत्सलाबाई राके स्मृती बुध्दीबळ स्पर्धा' यावर्षी रविवार २७ जूलै रोजी पाथरी रस्त्यावरील शुभमंगल कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी स्पर्धकांना २६ जुलै पर्यंत नोंदणी करता येणार असून स्पर्धेकरीता ४०० रुपये ऑनलाईन शुल्क जमा करावे लागणार आहे, त्यासाठी माहिती पत्रकामध्ये क्यूआर देण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्याला ५०,००० ची रोख पारितोषिके आणि स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. ही स्पर्धा एका दिवसामध्येच संपन्न होणार आहे. सकाळी साडेनऊ पर्यंत सर्वांनी कार्यालयात उपस्थित रहावे लागणार आहे, ठीक दहा वाजता पहिला राऊंड सुरू होणार आहे. टाईम कंट्रोल १० मिनिटाचा असून ५ सेकंद इन्क्रिमेंट असेल. साधारणपणे ७/९ राऊंड घेण्यात येतील आणि सायंकाळी पाच वाजता पारितोषिक वितरण समारंभ होऊन स्पर्धा संपन्न होईल.

दरम्यान, स्पर्धेबाबत सविस्तर माहितीपत्रक लवकरच प्रसारित करण्यात येईल, अशी माहिती संघटनेने दिली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार

## वीजभाराची विभागणी होणार, २२० के.व्ही लाइनला सबस्टेशन जोडले जाणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**

बीड शहर आणि ग्रामीण भागात सध्या सुरू असलेला वीजेचा लपंडाव होत आहे. सतत वीजपुरवठा खंडीत होत असल्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. यावर आता आ.संदीप क्षीरसागरांकडून मार्ग काढला जात आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा भार विभागणी म्हणजेच डिव्हाइड करून नागरिकांच्या मोठ्या समस्येवर पर्याय काढला जाणार आहे.

मागील काही महिन्यांपासून बीड शहर आणि ग्रामीण भागात सातत्याने विद्युतपुरवठा खंडीत होत आहे. सतत होत असलेल्या वीजेच्या लपंडावामुळे नागरिक हैराण झाले आहेत. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी या महत्त्वाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी वीजेचा भार विभागण्याचा पर्यायी मार्ग काढला आहे.

**असा निघणार पर्यायी मार्ग**

सध्या बीड शहर आणि ग्रामीण भागातील सर्व सबस्टेशन१३२ के.व्ही. च्या लाइनला जोडलेले आहेत. परंतु हा पुरवठा आवश्यक्तेपेक्षा कमी प्रमाणात होत आहे. यावर मार्ग काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून नवीन २२० के.व्ही. लाईनचे काम सुरू आहे. सध्या हे काम प्रगतीपथावर असून बीड



शहरातील माळीवेस, एमआयडीसी, जालना रोड, पांगरी रोड या सबस्टेशनला आणि ग्रामीण भागातील नामलगाव, पेंडगाव, कुक्कडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा ही उपकेंद्रे १३२ के.व्ही. लाईनवरून लवकरच नवीन २२० के.व्ही. लाईनला जोडली जाणार आहेत. त्यामुळे बीड शहर आणि ग्रामीण भागात आवश्यक्तेनुसार मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बीडमधील नागरिकांच्या वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. महावितरणसह महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसमवेत

**आ.क्षीरसागरांनी केली पाहणी**

नवीन २२० के.व्ही. लाइनचे काम सुरू असून प्रगतीपथावर आहे. बुधवारी (दि.४) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील कामाची प्रत्यक्ष पाहणी केली यावेळी माजी आ.सय्यद सलीम, महावितरण विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

# महा ई-सेवा केंद्राकडून विद्यार्थ्यांची होणारी लूट शासनाने थांबवावी अन्यथा मनसेस्टाईल धडा शिकवू-सोमेश कदम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**



सध्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींसाठी किंवा शुल्कामध्ये सवलत मिळण्यासाठी महा ईसेवा केंद्राकडून प्रमाणपत्र काढायची असतात परंतू जिल्ह्यातील व तालुक्यातील महा ई सेवा केंद्राकडून विद्यार्थ्यांची मोठी लूट होत आहे ती थांबवावी अशी मागणी मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे दिली आहे. तसेच विद्याथ्यांची लूट केल्याचा प्रकार कोठेही घडल्यास मनसे स्टाईल धडा शिकवू असा इशारा पत्रकाद्वारे दिला आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटल आहे की, सध्या शैक्षणिक सवलतींसाठी किंवा शिष्यवृत्तीसाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्र ही महा ई सेवा केंद्राकडून मिळतात परंतू महा ई सेवा केंद्रचालक अव्वा ची सव्वा फीस घेवून गोर-गरीब विद्यार्थ्यांची लूट करीत आहेत जन मनसेच्या कानावर अशा तक्रारी आल्या तर त्यांना आम्ही मनसे स्टाईल धडा शिकवू तसेच जिल्हाधिकारी साहेबांनी देखील याकडे लक्ष देण्याची मागणी विनंती निवेदनाद्वारे केली आहे.

## समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हा उत्तम पर्याय-डॉ.योगेश क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**

लोणारी समाज संख्येने कमी असला, तरी शिक्षणाच्या माध्यमातून आपले अस्तित्व सिद्ध करत आहे. पारंपरिक व्यवसाय जवळपास लोप पावल्याने आता प्रगतीसाठी शिक्षण हा उत्तम पर्याय उरला आहे. समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणासोबतच नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी समाजातील दोन होतकरू युवकांना संस्थेमध्ये संधी देण्याचा निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड मतदारसंघ अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीड जिल्हा लोणारी समाज सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन शहरातील लोणारपुरा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, पत्रकार ड.संदीप बेदरे उपस्थित होते. प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष अनिल मुळेकर यांनी करताना समाजाच्या कार्याचा व इतिहासाचा परिचय दिला. यावेळी बोलताना कल्याणराव आखाडे यांनी ओबीसी समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजना व महामंडळांची माहिती उपस्थितांना दिली. समाज संघटन मजबूत करून, समाज माझा आहे, संघटना आपली आहे ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे, असे ते म्हणाले. मार्गदर्शन करताना ड. संदीप बेदरे यांनी सांगितले, गुणवंत विद्यार्थी म्हणजेच भाग्यवंत विद्यार्थी. त्यांच्या मेहनतीचं फळ आज समाज त्यांच्या पाठीशी उभा राहून देत आहे. दहावी, बारावीनंतरही उत्तम शिक्षण घेऊन ते उच्च पदांवर पोहोचावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शैक्षणिक साहित्य, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश अभिमन्यू मुळेकर यांनी केले. या कार्यक्रमाला माणिक दोडमिसे, नामदेव खांडेकर, नुकुल मुळेकर, किरण निंबाळकर, सुरज दोडमिसे, विनोद मुळेकर, विनोद ढेंबरे, मंगेश ढेंबरे, मनोहर दोडमिसे, संजय उंडे यांच्यासह समाजबांधव आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचा गोशाळेला चारा आणि वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा

### शिवसेना माजलगावचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ जून**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगावात शिवसेनेच्या वतीने गोशाळेला चारा आणि वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांना उदंड व निरोगी आयुष्य लाभावे यासाठी माजलगाव शिवसेनेच्या वतीने इतर वाई खर्चाला फाटा देऊन देवखेडा येथील गोशाळेला चारा देऊन व पुंनदगाव येथील श्री केदारेश्वर देवस्थानच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करून दिनांक ४ जून रोजी वाढदिवस



साजरा करण्यात आला आहे यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे युवा सेना उप तालुकाप्रमुख रामेश्वर काशीद किशोर झिंजुर्के मुन्ना बाहेती आधी उपस्थित होते

## बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासले याला अंबाजोगाई न्यायालयाची २ दिवसाची पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.४ जून**

बीडचे बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासले याला काल अंबाजोगाई पोलिसांनी न्यायालयाच्या परवानगीने मुंबई येथील जेल मधून ताब्यात घेऊन अंबाजोगाई मध्ये आणल्या नंतर आज येथील न्यायालयात हजर करण्यात आल्या नंतर न्यायमूर्ती यांनी कासले यास २ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

बीडचे बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासले याला रविवारी पोलिसांनी दिल्ली येथे अटक केल्या नंतर सोमवारी मुंबईतील किल्ला कोर्टात हजार करण्यात आले न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असताना अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनला रणजीत कासले याचे विरुद्ध दाखल गु र न २१४/२०२५ कलम ३१६ (२), ३१८ (४) बी एन एस या कलमा नुसार दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अंबाजोगाईचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पवार पोलीस कॉन्स्टेबल चादर पोलीस कॉन्स्टेबल भागवत नागरगोजे वाहन चालक ए एस आय शिंदे हे पोलीस पथक काल मुंबई मध्ये दाखल झाले. या पथकाने न्यायालयाच्या परवानगीने काल दुपारी कासले न्यायालयाच्या परवानगीने काल दुपारी कासले यांना ताब्यात घेतले आणि अंबेजोगाई मध्ये आणले असता आज प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्या. अश्विनी ढवळे यांच्या कोर्टात हजर करण्यात आले असता न्यायालयाने कासले यास दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. यावेळी सरकार पक्षातर्फे ड गिरी तर आरोपी पक्षातर्फे ड. नवनाथ साखरे यांनी काम पाहिले.

## गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या ऊसतोड कामगार महिलांची संख्या चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**

बीड जिल्ह्यामध्ये ८४३ महिलांची गर्भपिशवी काढली यात तीस ते पस्तीस वयोगटातील ४७७ महिला असल्याची बातमी काही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली आहे ही बातमी चुकीच्या माहितीवर आधारित असून याबाबत वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे. सन २०२४ मध्ये एक जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत संपूर्ण वर्षभरात बीड जिल्ह्यात शासकीय रुग्णालयांमध्ये ५२७ गर्भाशय शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यात गर्भाशय शस्त्रक्रिया केलेल्या एकूण ऊसतोड महिला कामगारांची संख्या केवळ ८ इतकी आहे.

याच एक वर्षाच्या कालावधीत खाजगी रुग्णालयांमध्ये ६५६ गर्भाशय शस्त्रक्रिया झाल्या तर २२ प्रकरणी शस्त्रक्रिया नाकारण्यात आल्या यातील एकूण ऊसतोड कामगार महिलांची संख्या ५५ इतकी आहे व या दोन्ही गटात वय वर्ष ३५ व त्याखालील ऊसतोडीस जाणाऱ्या एकूण महिलांची संख्या ० इतकी आहे असा लेखी खुलासा बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी केला आहे.

चालू वर्षात १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत शासकीय रुग्णालयात झालेल्या गर्भाशय शस्त्रक्रियांची संख्या ९८ आहे यात ऊसतोड कामगार महिला किंवा वय वर्ष ३५ व त्याखालील ऊसतोड कामगार महिला यांची संख्या देखील ० इतकी आहे.

याच पाच महिन्यांच्या कालावधीत खाजगी रुग्णालयांमध्ये २६८ शस्त्रक्रिया झाल्या तर सहा शस्त्रक्रिया नाकारण्यात आल्या, यात गर्भाशय शस्त्रक्रिया केलेल्या ऊसतोड महिला कामगारांची संख्या ५२ इतकी आहे व त्यातील केवळ एक ऊसतोड कामगार महिला ३५ वर्षे वयाखालील असल्याचेही या लेखी खुलाशात म्हटले आहे.

हा विषय अत्यंत संवेदनशील विषय असून याचे गांभीर्य लक्षात घेऊन गेल्या दोन वर्षांपूर्वी याबाबत शस्त्रक्रिया कशा पद्धतीने होतील याची कार्यपद्धती निश्चित करून देण्यात आली आहे. यासंदर्भात अधिकृतपणे कोणतीही माहिती न घेता कोणी वृत्त देत असेल तर त्यास प्रसिद्धी देऊ नये असे आवाहन देखील याद्वारे करण्यात येत आहे.

# परशुराम संस्कार सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**

विद्यार्थ्यांनी कायम वाचन, मनन, चिंतन करुन आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यासाठी गुणवत्तेत सातत्य ठेवणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचे आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड.कालिदास (नाना) थिगळे यांनी परशुराम संस्कार सेवा संघाच्यावतीने आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी केले.




परशुराम संस्कार सेवा संघाच्यावतीने इयत्ता १० व १२ वी परिक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे बीड शहरातील अंकुशनगर भागातील साई-पंढरी मंगल कार्यालयात रविवार (दि.१ जून) रोजी आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करुन करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड.कालिदास (नाना) थिगळे होते तर यावेळी पत्रकार प्रशांत सुलाखे, उद्योजक बाळासाहेब थिगळे, प्रा.संजयराव पत्की, सुषमाताई थिगळे, बाबा पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना अ‍ॅड. थिगळे म्हणाले की, जीवनात आलेल्या कठीण प्रसंगाला कधीही डगमगून जायचे नाही तर त्या कठीण प्रसंगांना सामोरे जावून यशाचे शिखर गाठाण्यासाठी जिद्द,चिकाटी आणि मेहनत करायला हवी. स्पर्धेच्या युगात जर टिकायचे असेल तर कठोर परिश्रम करण्याची तयार असणे आवश्यक आहे असेही अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते म्हणाले.

यावेळी परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजानन जोशी यांच्यासह मान्यवरांची समायोचित व मार्गदर्शनपर भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकूंद खडकीकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार अर्जनाताई जोशी, विनायकराव देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रवण थिगळे, ज्योतीताई थिगळे, थिगळे काका यांनी बहुमोल परिश्रम घेतले. यावेळी गुणवंत विद्यार्थी, पालक, परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिंदुसरा धरणावर पर्यटकांची हुल्लडबाजी सुरूच



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**

बीड शहराजवळील पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प १०० टक्के पुर्णतः भरलेले असुन धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहु लागले आहे या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असुन नागरीकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन करून सुद्धा पर्यटकांना याचे गांभीर्य नसुन त्याकडे दुर्लक्ष करत धरणाच्या भिंतीवर, सांडव्यावर, पायथ्याशी पर्यटक जमा होत असून पर्यटकांच्या हुल्लडबाजी व हलगर्जीपणामुळे अपघात घडुन जिवितहानी होऊ नये यासाठी प्रतिबंधकात्मक उपाययोजना म्हणून सुरक्षारक्षक तैनात करण्यात यावेत तसेच संभाव्य दुर्घटना घडल्यास संबधित विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी , आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड, उपविभागीय अधिकारी बीड,तहसीलदार बीड, पोलिस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन यांना केली आहे.

## खा.संजय जाधव यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ जून**

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे सोमवारी रात्री सुमारे साडेनऊच्या सुमारास शिवसेना (उद्धव ठाकरे पक्षाचे )उपनेते व परभणीचे खासदार संजय जाधव यांनी अत्यंत श्रद्धेने दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी परळीचे माजी उपनगराध्यक्ष राजा भैय्या पांडे यांच्या निवासस्थानी जाऊन अभिषेक व साक्षी या नवविवाहित दाम्पत्यास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या वेळी प्रा. पंढरीनाथ धोंडगे, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) चे उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल, तसेच सिराजभाई (कॉन्ट्रॅक्टर) उपस्थित होते.खासदार संजय जाधव यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांचा शिवसेना (उद्धव ठाकरे पक्ष ) तर्फे विशेष सत्कार करण्यात आला. नारायण सातपुते, भोजराज पालीवाल, राजा पांडे व सिराज कॉन्ट्रॅक्टर , संजय खाकरे, गणेश कासार, रमाकांत रेवडकर, मनोज रामदासी यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.या भेटीद्वारे राजकीय व सामाजिक सौहार्दाची जाणीव पुन्हा एकदा दिसून आली.

## विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार भरती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ जून**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बीडमध्ये सन २०२५-२६ या सत्रात विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार निवडीची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाने तयार केलेल्या एम.आय.एस. पोर्टलवर apprenticeship india.org या वेबसाईटवर शिकाऊ उमेदवार भरतीची कार्यवाही प्रथम ऑफलाईन पध्दतीने व नंतर ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे.

शिकाऊ उमेदवार निवडीबाबत विविध व्यवसायात भरावयाच्या जागा, विद्यावेतन, शैक्षणिक अर्हता, वय, शुल्क, शेवटची तारीख इत्यादी अटी व शर्तीच्या माहितीसाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या वरील वेबसाईटवर किंवा विभागीय कार्यालय, राष्ट्रीय परिवहन बीड-४३११२२, दुरध्वनी क्र. ०२४४२-२२२५८० येथे संपर्क साधवा, असे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.